दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७३ | शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### न शोभणारा धांगडधिंगा...

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पालकमंत्री पदावरून सत्ताधारी आघाडीतील तीनही पक्षांच्या मंत्री आणि नेत्यांकडून जो धांगडधिंगा सुरू आहे तो पालकमंत्री या शब्दाला अजिबात शोभणारा नाही. मंत्रिपदावरून निर्माण झालेली राळ कशीबशी शांत झाली आणि ती राळ पुन्हा पालकमंत्री पदाच्या नियुक्तीवरून उफाळून आली. नाशिक आणि रायगड या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदावरून शिवसेनेचा शिंदे गट नाराज आहे. नाशिकमध्ये शिंदे गटाचे दादा भुसे आणि रायगडमध्ये भरत गोगावले यांना पालकमंत्री पद हवे आहे.






# कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने ऊस उत्पादनात वाढ

## शरद पवार यांनी दिली नव्या तंत्रज्ञानाची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

**उसाच्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (एआय) वापर होत असून यामुळे उसाचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे. हे लक्षात घेऊन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारे संशोधन सुरू असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली.**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, बाळासाहेब पाटील तसेच संस्थेचे महासंचालक संभाजी कडू पाटील, सल्लागार ◀◀ पान २ वर

### “ यांत्रिक ऊस तोडणीवर अधिक भर देण्याची गरज – अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, गेल्या काही वर्षांत एफआरपीच्या रकमेत वाढ होत गेली मात्र एमएसपीच्या रकमेत वाढ झाली नाही. ती वाढणे गरजेचे आहे. सध्याचा दर ३६००– ३८०० रुपये असून ती वाढायला हवी. अंदाजे एप्रिल ते ऑगस्ट दरम्यान साखरेचे दर वाढणे शक्य आहे याबाबत केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्या सोबत चर्चा झाली आहे. तसेच खांडसरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता दिसत असल्याने त्यावर बंधने आणण्याचा विचार सुरू आहे. कारखान्यांच्या तुलनेत उसाचे क्षेत्र कमी आहे असे नमूद करून ते म्हणाले, याबरोबर यांत्रिक ऊस तोडणीवर अधिक भर देण्याची गरज आहे. साखर कारखानदारी आणि शासन यांच्यामध्ये समन्वय असण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

# वाल्मिक कराडचा जामीन अर्ज अचानक मागे

## कारण गुलदस्त्यात; नेमकं घडलं काय?



**बीड | प्रतिनिधी**

**वाल्मिक कराड यांचा जामीन अर्ज त्याच्या वकिलांनी अचानक मागे घेतला आहे. त्याच्या तब्येतीतही बिघाड झाल्याची माहिती समोर आली आहे. पोटदुखीच्या तक्रारीने त्याला बीड जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. त्याच्यावर उपचार सुरू केला असून काही चाचण्या करण्यात आल्या आहेत.** ◀◀ पान २ वर

### पोटदुखीचा त्रास, रुग्णालयात दाखल

याबाबत बीड जिल्हा रुग्णालयाचे प्रभारी शल्यचिकित्सक डॉक्टर एस.बी. राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मिक कराडला पोटात दुखण्याचा त्रास होत असल्याचे जिल्हा कारागृहाकडून कळवण्यात आले होते. त्यानुसार कारागृहात जाऊन तपासणी करण्यात आली. पुढील तपासणी करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करणे गरजेचे असल्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. त्यानुसार कारागृह प्रशासनाने जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. कराडवर सध्या उपचार सुरू आहेत. काही तपासणी करणे गरजेचे आहे. सोनोग्राफी, रक्त चाचणी, यूरिन टेस्ट केली जाणार आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे एसबी राऊत म्हणाले. पोटदुखीचा त्रास होत असताना वाल्मिक कराडला रात्री १२.३० वाजता जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या याच ठिकाणी त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# ठाकरेसेनेला मिळणार विरोधी पक्षनेतेपद

## महाविकास आघाडीच्या बैठकीत झाला निर्णय



**मुंबई | प्रतिनिधी**

**विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या दहा टक्के आमदार असलेल्या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद देण्याची तरतूद आहे. राज्यातील १५ व्या विधानसभेत एवढे संख्याबळ विरोधी बाकांवर बसलेल्या एकाही पक्षाकडे नाही. मात्र, निवडणुकीपूर्वी झालेल्या आघाडीमुळे त्यांच्याकडे एकत्रितपणे ४८ सदस्य आहेत. त्यामुळे आता विरोधी पक्षनेता मिळण्याची शक्यता आहे. त्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला विरोधी पक्षनेतेपद मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला घवघवीत यश मिळाले आणि महाविकास आघाडीला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे विरोधी पक्षनेतेपद कोणाला मिळणार याकडे लक्ष लागले होते. मात्र, आता हे पद ठाकरेंच्या शिवसेनेला मिळणार आहे.**


गेल्या सरकारमध्ये विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे तर विधान परिषदेचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे होते. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार आणि विधान परिषदेत शिवसेनेचे अंबादास दानवे विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहत होते. दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या ◀◀ पान २ वर

### विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाकडे लक्ष

विरोधी पक्षनेतेपदाचे हे घटनेने दिलेले पद आहे. राजकारणात विरोधी पक्षनेतेपद हे मुख्यमंत्र्यांच्या समकक्ष असते. जेवढे अधिकार व मानसन्मान मुख्यमंत्र्यांना असतो, तेवढाच या पदाला असते. सभागृहात विरोधी पक्षनेते उभे झाल्यास विधानसभाध्यक्षही त्यांना प्राधान्य देतात. अशावेळी सामूहिक नेता निवडल्यास विरोधी पक्षनेता देता येणे शक्य आहे. परंतु, हा सर्वाधिकार विधानसभाध्यक्षांकडे आहे. त्यावर नवे विधानसभा अध्यक्ष काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पराक्रम दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी दिल्ली | वृतसंस्था**



नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संसद परिसरात शाळकरी मुलांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान आणि मुलांमध्ये प्रश्नोत्तरासह चर्चा झाली.

पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना विचारले की, २०४७ पर्यंत राष्ट्राचे ध्येय काय आहे? त्यावर एका विद्यार्थ्याने उत्तर दिले की, भारताला विकसित राष्ट्र बनवणे. यालाच जोडून पंतप्रधानांनी २०४७ पर्यंतच का असे विचारल्यास दुसऱ्या विद्यार्थ्याने ‘‘तेव्हा भारत स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करेल आणि आमची पिढी देशसेवेसाठी तयार असेल,‘‘ असे उत्तर दिले. यावेळी पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांना आजच्या दिवसाचे महत्त्व तसेच नेताजींचे कोणते वाक्य तुम्हाला सर्वात जास्त प्रेरणा देते असा प्रश्न विचारला. यावर एका विद्यार्थ्याने ‘‘तुम मुझे खून दो, मै तूम्हे आझादी दुंगा‘‘ हे उत्तर दिले. याव्यतिरीक्त पंतप्रधानांनी कार्बन कमी ◀◀ पान २ वर

# बाळासाहेब ठाकरेंना भारतरत्न द्या, तो स्वातंत्र्यवीर सावरकरांचाही गौरव ठरेल

## ठाकरे गटाची सरकारकडे मागणी

**मुंबई | प्रतिनिधी**

**शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त २३ जानेवारी रोजी मुंबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राजकीय मंडळींनी बाळासाहेब ठाकरेंना आदरांजली वाहिली. बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न मिळायला पाहिजे, अशी मागणी खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर बाळासाहेबांनी महाराष्ट्राच्या जनतेला अभिमानाने जगायला शिकवले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना बाळासाहेब ठाकरे माहितीच नाही. प्रतिकूल परिस्थितीत सामना करून उभे राहण्याचे काम आम्हाला बाळासाहेब ठाकरे यांनी शिकवले. हातामध्ये सत्ता नसताना त्यांनी मराठी माणसांसाठी संघर्ष केला. बाळासाहेबांनी सर्व राजकीय पदे सहकाऱ्यांना दिली होती. स्वत: कधीही कुठल्या पदावर आले नाहीत. बाळासाहेबांनी शिवसेनेत गट कधी तयार केला नाही. मार्केटमध्ये ब्रँडच्या काही ड्यूप्लिकेट गोष्टी येतात, अशी टीका संजय राऊत यांनी शिवसेना शिंदे गटावर केली. ते पुढे म्हणाले की, ◀◀ पान २ वर

# आर्थिक घोटाळ्याचे परळी कनेक्शन

## पंढरपुरातील ३० ठेवीदारांना एक कोटीचा गंडा

**सोलापूर | प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आणि खंडणीच्या गुन्ह्यात अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याच्यामुळे परळी राज्यात चर्चेत असतानाच आता आर्थिक घोटाळ्याचे परळी कनेक्शन समोर आले आहे. परळीच्या राजस्थानी मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीकडून पंढरपुरातील ३० ठेवीदारांना जवळपास एक कोटीचा गंडा घातल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी राजस्थानी मल्टीस्टेट सोसायटीच्या चेअरमन, संचालकासह येथील व्यवस्थापकावर पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पंढरपुरातील तक्रारदार सेवानिवृत्त शिक्षक देवेंद्र तुकाराम गोंजारी यांनी राजस्थान मल्टीस्टेट सोसायटीच्या पंढरपूर शाखेत ८ सप्टेंबर २०२३ रोजी १६ लाख ९९ हजार रूपयांची ठेव पावती केली होती. २४ एप्रिल २०२४ रोजी ठेव पावतीची मुदत संपल्यानंतर पैसे परत मिळावे अशी मागणी शाखा व्यवस्थापक स्वप्नील कुलकर्णी यांच्याकडे मागणी केली. मात्र कुलकर्णी यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. वारंवार पैशाची मागणी करूनही पैसे मिळत नसल्यामुळे देवेंद्र गोंजारी यांनी सोसायटीचे चेअरमन चंदुलाल बियाणीसह संचालक, व्यवस्थापक अशा १८ जणांविरोधात पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ◀◀ पान २ वर

# शरद पवार–अजित पवार एकाच मंचावर

## अजित पवारांनी शरद पवारांच्या शेजारची जागा बदलली



**पुणे | प्रतिनिधी**

वसंतदादा शुगर इन्सटिट्यूडच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधरण सभा आणि पारितोषिक वितरण समारंभाच्या निमित्ताने गुरूवारी दि.२३ रोजी अजित पवार आणि शरद पवार हे दोघे एकाच मंचावर आले होते. यावेळी अजित दादांनी केलेली कृती सर्वांचे लक्ष वेधून गेली. शेजारी शेजारी केलेली बैठक व्यवस्था खुद्द अजित पवार यांनीच बदलली. तसेच स्वतः आपल्या नावाची पाटी एक खुर्ची सोडून बाजूला सरकवली आणि आसन व्यवस्था बदलून घेतली. त्यांनी ही केलेली कृती कॅमेऱ्यात कैद झाली आणि त्यांच्या या कृतीची सर्वत्र चर्चा सुरू झाली. ◀◀ पान २ वर

# परळीच्या भरत गीते यांच्या टॉरल इंडिया कंपनीचा दावोसमध्ये महाराष्ट्र शासनाशी करार

## मंत्री धनंजय मुंडे यांनी पोस्ट शेअर करत भरत गीते यांचे समस्त परळीकर यांच्या वतीने केले अभिनंदन

**मुंबई | प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातील नंदागौळ या छोट्याशा गावात जन्मलेले परळीचे भूमिपुत्र भरत गीते यांच्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने दाऊशे ते सुरू असलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम मध्ये महाराष्ट्र शासनाची दोन प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्याबाबत सामंजस्य करार केला असून, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी याबाबत पोस्ट शेअर करत भरत गीते व त्यांच्या टीमचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे.**



भरत गीते यांच्या टरल इंडिया या कंपनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुपा व अहिल्यानगर या ठिकाणी अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग सोल्युशन निर्माण करून ते जगभरात निर्यात करता येईल अशा पद्धतीचे प्रकल्प उभारण्यात येणार असून ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९.५० क्विंटल | २,५६४ | २,९१८ | २,७२७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४२.५० क्विंटल | २,०५१ | २,६७२ | २,२७३ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १४२.५० क्विंटल | ६,४४० | ७,२३१ | ७,०२८ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,२८० | २,९५५ | २,६१४ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: ९५.०० क्विंटल | ४,००० | ४,१०० | ४,०६६ |
| हरभरा: १३.०० क्विंटल | ५,७०१ | ६,८०० | ६,१०० |

# खांबा ग्रामस्थांचे औदार्य; भगवानगडाला दिली १ कोटी १ लाख रुपयांची देणगी

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**मानूर | प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात.नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.**

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे शिरूर कासार तालुक्यातील मौजे खांबा येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले.त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले.जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी १ लाख रुपये झाली.नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# न शोभणारा धांगडधिंगा...

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पालकमंत्री पदावरून सत्ताधारी आघाडीतील तीनही पक्षांच्या मंत्री आणि नेत्यांकडून जो धांगडधिंगा सुरू आहे तो पालकमंत्री या शब्दाला अजिबात शोभणारा नाही. मंत्रिपदावरून निर्माण झालेली राळ कशीबशी शांत झाली आणि ती राळ पुन्हा पालकमंत्री पदाच्या नियुक्तीवरून उफाळून आली. नाशिक आणि रायगड या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदावरून शिवसेनेचा शिंदे गट नाराज आहे. नाशिकमध्ये शिंदे गटाचे दादा भुसे आणि रायगडमध्ये भरत गोगावले यांना पालकमंत्री पद हवे आहे. त्यांना हे पद न मिळाल्याने त्यांच्या समर्थकांनी चक्क सामूहिक राजीनाम्याचे हत्यार उपसले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्री पदाची यादी जाहीर केली आणि ते थेट विदेश दौऱ्यावर निघून गेले. ते येईपर्यंत लोक वाद उपस्थित करणार नाहीत असा त्यांचा बहुधा अंदाज असावा. पण या पालकमंत्री होण्यासाठी इच्छुक असलेल्या मंत्री आणि त्यांच्या समर्थकांनी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीची अथवा अनुपस्थितीची फारशी फिकीर केली नाही आणि त्यांनी मोकळेपणाने अकांडतांडव आरंभले. त्याची धग इतकी वाढली की आपल्या दरेगावी शेती बघण्यासाठी गेलेल्या एकनाथ शिंदे यांनी चक्क बंडच पुकारल्याच्या बातम्या आल्या. एकनाथ शिंदे यांनीही खुलेपणाने गोगावले आणि भुसे यांच्या मागणीचे समर्थन केले. या दोन्ही नेत्यांना आपापल्या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची अपेक्षा ठेवण्यात गैर काय, असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. त्यामुळे शेवटी या दोन्ही नियुक्त्यांना स्थगिती द्यावी लागली.

इकडे भाजपच्या नेत्यांनी उचलखाल्ली आणि त्यांनी या दोन्ही जिल्ह्याचे पालकमंत्री पद बदलले जाणार नाही अशी भूमिका घेतलेली दिसली. तशातच राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातही पालकमंत्री पदावरून नाराजी उफाळून आली आहे. वादग्रस्त ठरलेल्या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद अजित पवार यांना दिले गेल्यानंतर तिथले वातावरण शांत होईल असे अपेक्षित होते, पण तिथे पंकजा मुंडे यांनीही आपला नाराजीचा सूर आळवणे सोडले नाही. आपण इतकी वर्षे बीडमध्ये काम करीत आहोत, यापूर्वी पाच वर्षे या जिल्ह्याचे पालकमंत्री पद आपण स्वीकारले होते, त्यावेळी बीडची परिस्थिती आपण सुरळीत ठेवली होती, त्यामुळे या जिल्ह्याचे पालकमंत्री पद आपल्याला मिळाले असते तर अधिक आनंद झाला असता अशी संयमी पण नाराजी व्यक्त करणारी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली. तिन्ही पक्षांच्या ज्येष्ठ मंत्र्यांच्या या नाराजीचा फटका सरकारच्या कामकाजाला बसू शकतो किंबहुना त्यांच्यातील या नाराजीचे असे जाहीर प्रदर्शन होणे हे महायुती सरकारच्या प्रतिमेला बाधक ठरू शकते याची फिकीर कोणीच करताना दिसत नाही. मुळात या तीन पक्षांच्या सरकारमध्ये पहिल्या दिवसापासूनच जी सुंदोपसुंदी सुरू आहे त्यातून सरकार एकजिनसीपणा गमावून बसले आहे. तिन्ही पक्षांची तीन वेगवेगळ्या दिशेला तोंडे असल्याचे यातून स्पष्ट होते आहे. त्यामुळे राज्य सरकारचा कारभार या पुढील काळात दिशाहीन होणार आणि जनतेच्या वाट्याला वैफल्यच येणार असाच सारा रागरंग दिसतो आहे. खरं पाहता महाराष्ट्र वगळता अन्य राज्यांमध्ये पालकमंत्री ही संकल्पनाच अस्तित्वात नाही. ही संकल्पना महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून राबवली जात आहे. त्या योजनेमागे अपेक्षा ही होती की संपूर्ण जिल्ह्याचा सुनियोजित विकास करण्यासाठी एक जबाबदार मंत्री म्हणून पालकमंत्र्याने तेथे काम करणे अपेक्षित आहे. या मंत्र्याने या जिल्ह्याच्या अडचणी सरकारी पातळीवर मांडाव्यात आणि त्याचे प्रभावीपणे निराकरण करून घ्यावे अशी त्यात अपेक्षा असते. पण त्यातून पालकमंत्री पदाला त्या जिल्ह्यापुरता मुख्यमंत्रिपदाचाच दर्जा मिळाल्याची स्थिती अलीकडच्या काळात पाहायला मिळते. जिल्ह्याचे नियोजन आणि विकासाची दिशा पालकमंत्र्यांच्या लहरीवर अवलंबून ठेवली गेलेली दिसते. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या कलांनीच त्या त्या जिल्ह्याचा कारभार हाकलेला पाहायला मिळतो. निदान पूर्वी बाहेरचा मंत्री त्या जिल्ह्याला पालकमंत्री म्हणून द्यायची प्रथा होती. जो मंत्री ज्या जिल्ह्यात राहतो त्या मंत्राला त्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद दिले जात नव्हते. पण नंतर नंतर त्या प्रथेलाही फाटा दिला गेला आणि जिल्ह्यातल्याच एखाद्या मंत्र्याकडे पालकमंत्री पदाचे अधिकार दिले जाऊ लागले. त्यातून सतत मंत्रिमंडळात असलेल्या मंत्र्यांनी आपले संस्थान त्या त्या जिल्ह्यात निर्माण केलेले दिसले. पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी अजित पवारांचा सातत्याने होणारा आग्रह हा याच भूमिकेतून होत असावा. अजित पवारांच्या ताब्यात पालकमंत्री पद आल्यानंतर पुण्यातील त्यांच्या समर्थकांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला, पण त्याचवेळी पलीकडे भाजपच्या गोटात मात्र दबक्या आवाजात नाराजीचे सूर निघू लागले. जवळपास प्रत्येक जिल्ह्यातच अशी स्थिती निर्माण झालेली पाहायला मिळते आहे. महाराष्ट्राने आता या पालकमंत्री संकल्पनेचाच फेरविचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## वाळू उपसा करणाऱ्या व्यक्तीकडून तहसीलदारासह पथकाला जीव मारण्याची धमकी

**अंबड । प्रतिनिधी**

वाळू उपसा करणाऱ्या विरुद्ध कारवाईसाठी अंबड तहसीलदार व त्यांचे पथक केले असता कारवाईदरम्यान एका व्यक्तीने त्यांना जीव मारण्याची धमकी दिली याप्रकरणी अंबड तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली या प्रकरणी करीत घटना २३/०१/२०२५ रोजी घडली कृष्णा एडके, मंडळ अधिकारी गोंदी, तलाठी साडेगाव विनोद ठाकरे, तलाठी पाथरवाला बु. स्वप्निल खरात, तलाठी घुंगर्डे हातगाव दिपक लव्हाळे, तलाठी हसनापुर आनंद जांभळे, तलाठी गोंदी किरण जाधव असे अवैध गौण खनिज विरोधी कारवाया चोरी व उत्तखन रोखण्यासाठी पथकासह सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय अंबड येथुन रवाना झालो. अंबड तहसिल कार्यालय हद्दीत गस्त घालत असताना पाथरवाला गावातील गोदावरी नदीपात्रातील बाबाची थडी या ठिकाणी गस्त कामी हजर असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे पाथरवाला बुद्रुक गट क्रमाक ७४ येथे एक केनिसह ट्रक्टर उभे असल्याचे सांगितले. बातमीची खात्री करणेसाठी आम्ही वर नमुद पथकासह १३.३० वाजेच्या सुमारास त्या ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी लाल रंगाचे महिंद्रा कंपनिचे ५७५ या मॉडेलचा ट्रक्टर हेड हे मागिल बाजुला वाळु उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणा-या केनिसह आढळुन आले. सदर वाहनावर कसल्याही



प्रकारचा आरटिओ क्रमांक दिसुन आला नाही. सदर ठिकाणी बाजुच्या शेतात एक व्यक्ती उपस्थित होते त्यांना बोलावुन सदर वाहनाबाबत कोणाचे मालकिचे आहे याबाबत विचारणा केली असता सदर ट्रक्टर वाहन हे राहुल विक्रम फुलारे रा. पाथरवाला यांचे मालकिचे असलेबाबत सांगितले. त्यानंतर सदरचे वाहन हे महाराष्ट्र महसुल संहिता १९६६ चे कलम ४८(७) (८) व प्रचलित इतर कायद्यानुसार कार्यवाही करण्याकरिता ताब्यात घेवुन जप्त करुन घेवु जात असताना व सदरील वाहन हे तहसिल कार्यालय अंबड येथे पुढील कारवाई करिता घेवुन जात असताना एक व्यक्ती मोटारसायकलवर येवुन सदर मोटारसायकल ही सदर ट्रक्टर वाहनास आडवी लावले त्यावर त्यांना तुम्ही शासकिय कामात अडथळा का करित आहात असे विचारले असता त्याने तुम्ही हे वाहन घेवुन जावुच शकत नाही मी बघतोच तुम्ही कसे घेवुन जाता असे बालुन सदर ट्रक्टर चालवत असलेले तलाठी स्वप्निल खरात यांना खाली ओढले व पथकासोबत हुज्जत घालुन जिये ठार मारण्याची धमकी दिली व स्वःत ट्रक्टर बाहनावर बसुन सदरचे वाहन हे पथकाचे ताब्यातुन चोरी करून घेवुन पळवुन घवुन गेले व आम्ही करित असलेल्या शासकिय कर्तव्यात फौजदारीपात्र बलप्रयोग करून शासकिय कामात अडथळा आणला, शासकिय लोकसेवक त्याचे कर्तव्य करित असताना त्याने धाकाने परावृत्त व्हावे यासाठी आमच्या पथकाविरुध्द महिलांकरवि आमचेवर खोटे गुन्हे दाखल करु, तुम्हाला जिवंत सोडणार नाही, तुम्हाला संपून टाक अशा प्रकारच्या धमक्या दिल्या. म्हणून माझी त्याचे विरुध्द सरकार तर्फे भारतिय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२,३०३(२) तसेच महाराष्ट्र जर्मिन महसूल संहिता कलम ४८(७) (८) व महाराष्ट्र राजपत्र १२ जानेवारी २०१८ चे तरतुदीनुसार माझी राहुल विक्रम फुलारे रा. पाथरवाला याचेविरुध्द कायदेशिर तक्रार आहे.

## व्हॉइस ऑफ मीडियाच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी अविनाश कवळे तर जिल्हाध्यक्षपदी राजेश भालेराव



**जालना । प्रतिनिधी**

**व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी मराठवाडा उपाध्यक्षपदी अविनाश कवळे यांची तर जालना जिल्हाध्यक्षपदी राजेश भालेराव यांची निवड केली आहे.**

जालना येथे आयोजित एका बैठकीत मराठवाडा जिल्हा मराठवाडा उपाध्यक्ष अविनाश कवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलवण्यात आली होती या बैठकीस ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, ज्येष्ठ पत्रकार, मकरंद जहागीरदार, नूर अहमद यांची विशेष उपस्थिती होती तर व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेश पदाधिकारी विजय चोरडिया यांची ऑनलाईन उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते मराठवाडा उपाध्यक्षपदी अविनाश कवळे यांची निवड करण्यात आली तर जालना जिल्हा अध्यक्षपदी राजेश भालेराव यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केली. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, पत्रकारांचे हीत लक्षात ठेवून पत्रकारांच्या हक्कासाठी व्हॉईस मीडियाने आवाज उठवला पाहिजे त्याचप्रमाणे जिल्ह्यात पत्रकारांची मोठी फळी निर्माण करून पत्रकारांना न्याय व हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न करावे. शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरावे असे ते म्हणाले. विजय चोरडिया यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की ज्यांना जिल्ह्यातील दैनिक साप्ताहिक तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया यांना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी समन्वय साधून काम करावे तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी संघटनेच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्यासाठी प्रयत्न करावे असे ते म्हणाले. यावेळी जेष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यातील पत्रकारांना योग्य मान सन्मान द्यावा छोट्या किंवा मोठ्या दैनिकात काम करणारा हा पत्रकारच असतो त्यामुळे हक्कासाठी संघटनेने काम करावे. जिल्ह्यातील पत्रकारांची एक मोट बांधून पत्रकारांच्या पदरात शासनाच्या माध्यमातून जे काही मिळेल त्यासाठी प्रयत्न करावे. यावेळी जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याबद्दल राजेश भालेराव यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे विजय चोरडिया तसेच अविनाश कवळे यांनी जिल्हाध्यक्ष पदाची जी जबाबदारी संघटनेच्या माध्यमाने दिली आहे ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करून पत्रकारांसाठी भरीव असे काम करणार. यावेळी अध्यक्ष समारोप करताना अविनाश कवळे होणारे म्हणाले की, मागील दोन वर्षापासून जालना जिल्हा अध्यक्षपदी काम करत असताना आपण सर्वांनी मोलाची साथ दिली तीच साथ आपण सर्वांनी मिळून राजेश भालेराव यांना द्यावी. व्हॉइस ऑफ मीडियाच्या माध्यमातून पत्रकारांना न्याय देता आले याचे समाधान असून भविष्यात ही व्हाईस ऑफ मीडियाच्या माध्यमातून पत्रकारांसाठी काम करत राहणार असे मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविकांत दानम यांनी केले तर आभार कैलास फुलारी यांनी मानले. या कार्यक्रमास पत्रकार राजेश भिसे, लियाकत अली खान, विकास बागडी, अर्पण गोयल, भरत मानकर, सदानंद देशमुख, सुयोग खर्डेकर, शिवाजी म्हस्के, लेवी निर्मल, गिराम शिवाजी बावणे, देवचंद सावरे, ओ.के शिंदे, हुसेन कादरी, कोंडीबा अनपट, सचिन सर्वे, मनोज गरदास, सुनील खरात, प्रदीप मुरमे यांची उपस्थिती होती.

## खोलेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**खोलेश्वर महाविद्यालय, आंबेजोगाई व डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय व्यवसाय व समुपदेशन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले .या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली .आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ . बाळासाहेब मुंडे यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले .**

त्यांनी आपल्या प्रस्ताविकात ही दोन दिवशीय समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्याचा उद्देश सांगितला. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग निर्माण करण्या पाठीमागील हेतू काय आहे तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण व्हावे जीवन जगताना आवश्यक असणारे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावरती रुजविण्यासाठी शिक्षण दिले जाते .त्यामध्ये ग्रामीण पत्रकारिता , ग्रंथालयाचा कोर्स यासारख्या विविध स्वरूपाचे कोर्स या विभागाच्या माध्यमातून राबविले जाते . असे त्यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ . सुधाकर शेंडगे या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, आजीवन शिक्षण ही काही तरी वेगळी गोष्ट आहे. विद्यार्थी खरंच शिक्षण घेत आहेत का त्यातील १०% टक्के विद्यार्थी हे मला काही तरी शिकायचे आहे असे विद्यार्थी आहेत तर बाकीचे ९०% टक्के विद्यार्थी हे डिग्री पूर्ण करण्यासाठी शिक्षण घेत आहेत .ते पुढे बोलताना म्हणाले की ,शिक्षण क्षेत्रामध्ये मुलांपेक्षा मुलींचे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे या मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सावित्रीबाई यांनी दाखवून दिले. शिक्षण खरे कुठे आहे ते सांगताना पुढे म्हणाले की, शिक्षण घेत असताना संस्काराची गरज आहे खरे शिक्षण हे वर्गाच्या बाहेर आहे चार भिंतीतील शिक्षणापेक्षा वर्गाच्या बाहेरील शिक्षण हे कधीही कौशल्य विकसित करणारे असते . कोणत्याही वर्गात



नापास होणे म्हणजे शिक्षण संपले असे नाही तर नापास झालेली माणसे सुद्धा इतिहास घडवू शकतात असे त्यांनी आपले मत या प्रसंगी मांडले. यश मिळण्यासाठी जिद्द चिकाटी विश्वास असला पाहिजे आजीवन शिक्षण विभागाने कौशल्य शिक्षण याची सुरुवात केली आहे . छोटे छोटे कोर्सेस निर्माण केले आहेत. त्याद्वारे शिक्षण घेऊन विद्यार्थी स्वतःला सिद्ध करून रोजगार मिळवतात पुढे बोलताना म्हणाले की ,रोज नवीन गोष्टी आत्मसात करायला शिका त्यामुळे तुमचे भविष्य उज्वल होईल असे या प्रसंगी त्यांनी सांगितले . या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिपक फुलारी सर हे आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना म्हणाले की, शिक्षण शाळा - महाविद्यालयातील शिक्षणावर अवलंबून न राहता बाहेरील कौशल्य आधारित शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या पायावर उभा राहिले पाहिजे असे त्यांनी मत अध्यक्ष समारोपत बोलताना केले .यानंतर पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा . सतीश हिवरेकर यांनी नवीन शैक्षणिक धोरण याविषयी आपले विचार मांडले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की , भारताचे शैक्षणिक धोरण उच्च प्रतीचे होते. त्यात प्रामुख्याने तक्षशिला व नालंदा विद्यापीठ मधून हे शिक्षण दिले जात होते त्या विद्यापीठामधून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले होते .मात्र स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी येथील शिक्षण पद्धती मुळापासून संपवण्यासाठी प्रयत्न केले व त्यासाठी त्यांनी इंग्रजी शैक्षणिक धोरण इथे रूजविण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षकांत काही बदलासाठी नवीन शैक्षणिक धोरण निर्माण केले. १९८६ चे नवीन शैक्षणिक धोरण आले त्यात ३५ वर्षे हे शिक्षण सुरू होते. त्यानंतर बहिस्थ शिक्षणास सुरुवात झाली . काळ बदलला आवश्यक गरजा बदलल्या त्यानुसार हे शिक्षण बदलावे लागले त्यामुळे त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचे काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ही याप्रसंगी सांगितली. पुढे म्हणाले की, शैक्षणिक धोरणातील असलेल्या बदलानुसार मातृभाषेतून शिक्षण असले पाहिजे असे या नवीन शैक्षणिक धोरणात मान्य करण्यात आले आहे .ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. त्यांना त्यांच्या आवडीचे विषय घेता आले पाहिजेत तसेच भारताची ज्ञान परंपरा मोठी आहे. त्या परंपरेचा वापर या शैक्षणिक धोरणात झाला पाहिजे. असे मत त्यांनी याप्रसंगी मांडले. शेवटी या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . बिभीषण फड यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. दुसऱ्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक गौतम गायकवाड यांनी लेखन व संभाषण कौशल्य याविषयी आपले विचार मांडले. या विषयावर बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी लेखन आणि संभाषण कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे . म्हणून कौशल्य शिक्षण घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहू शकता. ज्ञानाच्या बरोबर कौशल्य शिक्षण घेणे आवश्यक आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनीआपल्या संभाषण व लेखन कौशल्यावर विशेष भर देऊन ज्ञान मिळविले पाहिजे असे मत त्यांनी या प्रसंगी मांडले .या सत्राचे अध्यक्ष वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ .सुभाष पटेकर यांनी अध्यक्षीय समारोप केला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा.रमण झरीकर यांनी केले . या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्रचार्य डॉ . कुंबेफळकर, उपप्राचार्य डॉ बिभीषण फड ,उपप्राचार्य डॉ .फुलारी सर ,प्राध्यापक बंधू- भगिनी तसेच विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने

शिवाजीराव देशमुख आदी व्यासपीठावर होते. शरद पवार म्हणाले, बदलते हवामान, पावसाचा लहरीपणा आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेता पुढील काळात साखर कारखान्यांना ठराविक वेळेतच उसाचे गाळप करण्याची वेळ येईल असे नमूद करून ते म्हणाले, म्हणून उसाच्या क्षेत्रात वाढ करणे आणि उत्पादकता वाढविणे यावर अधिक भर द्यावा लागणार आहे. याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. संस्थेच्या वतीने काही जिल्ह्यांत संशोधन केंद्र सुरू केली आहेत. या माध्यमातून ऊसउत्पादक शेतकऱ्यांना माहितीची सुविधा उपलब्ध होणार आहे. केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण प्रमाण २० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आजवर राज्यातून ८५ कोटी लिटर पुरवठा करण्यात आला आहे यामुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे असे पवारांनी सांगितले. दरम्यान, सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, सहवीजनिर्मितीसाठी शासनाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे तोटा दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच ऊस तोडणीसाठी यंत्राला अनुदान देण्यात येत आहे. आजवर ९०० यंत्रांना मान्यता देण्यात आली आहे. उपाध्यक्ष वळसे पाटील यांनी प्रास्ताविक केले. महासंचालक कडू पाटील यांनी विषयपत्रिकेवरील ठराव मांडले. ते सभेत मंजूर करण्यात आले.

------------

### ठाकरेसेनेला मिळणार

बैठकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून अनिल परब, सुनील प्रभू तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, नसीम खान उपस्थित होते. यावेळी निवडणुकीत मिळालेला कौल हा विरोधी पक्षनेता बनवू शकत नाही. परंतु, यासाठी विधानसभा अध्यक्षांची मर्जी असेल व निर्णय घेत असतील तरच विरोधी बाकाला नेता मिळू शकतो. अन्यथा, प्रत्येक गटनेत्यांवर त्या पक्षाची जबाबदारी अवलंबून असेल.

-----------

### वाल्मिक कराडचा जामीन अज

वाल्मिक कराड याचा खंडणी प्रकरणातील जामीन अर्ज मागे घेण्यात आला आहे. वाल्मिकच्या वकिलांनी हा अर्ज मागे घेतला आहे. जामीन अर्जाच्या सुनावणीसाठी दोन तारखा झाल्यानंतर सुनावणी होणार होती. त्यामुळे कराडला जामीन की एमसीआर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. मात्र वाल्मिकचे वकील अशोक कवडे यांनी जामीन अर्ज मागे घेतला आहे. जामीन अर्ज मागे घेण्याचे कारण गुलदस्त्यात आहे. मात्र, कराड याने अर्ज मागे घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वाल्मिक कराडने जामीन अर्ज मागे घेतल्याची माहिती समोर आलेली असतानाच कराड याची प्रकृतीही बिघडल्याचे समोर आले आहे. वाल्मिक कराडला पोटदुखीचा त्रास होत आहे. त्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

-----------

### आर्थिक घोटाळ्याचे

फ़पंढरपूर शहरातील ३० लोकांच्या सुमारे १ कोटी रूपयांच्या ठेवी परळीच्या राजस्थानी मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये आहेत. या ठेवीदारांनाही त्यांचे पैसे मिळाले नाहीत. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून इतरांचा शोध सुरू आहे.

---------------

### बाळासाहेब ठाकरेंना

बाळासाहेब ठाकरे यांनी कधी स्वत:साठी काही मागितले नाही. मात्र राज्यातील, देशातील आणि जगभरातील हिंदुंची मागणी आहे. बाळासाहेब ठाकरे यांना देशातील सर्वोच्च सन्मान मिळाला पाहिजे. २०२६ ला बाळासाहेब ठाकरे यांची जन्मशताब्दी वर्ष सुरू होणार आहे. त्याआधी त्यांना भारतरत्न द्यावे, तुम्ही स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न देऊ शकले नाहीत. त्यामुळे बाळासाहेबांना भारतरत्न दिला तर तो स्वातंत्र्यवीर सावरकर यांचाही गौरव ठरेल, अशी मागणी संजय राऊत यांनी केली. या देशात हिंदूत्वाच्या नावावर ढोंग सुरू आहे, याचा प्रतिकार उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेना करत आहे. अमित शाह आणि नरेंद्र मोदींना माझे आवाहन आहे, हे ढोंग बंद करा, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा भारतरत्न सन्मानाने गौरव करा. गेल्या काही काळात मोदी, शाह आल्यापासून राजकीय स्वार्थासाठी नियम डावलून भारतरत्न दिला जातो आहे. पण ज्याने या देशात हिंदूत्वाचे बिज रोवले आणि वाढवले त्या बाळासाहेब ठाकरेंना अजून भारतरत्न का दिला नाही?, असा सवालही संजय राऊत यांनी केला.

**२ शिवसेनेचे २ मेळावे**

शिवसेनाप्रमुख स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त गुरूवारी दोन शिवसेनेचे २ मेळावे झाले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या वतीने अंधेरीत मेळावा तर मुंबईतील बीकेसी परिसरात शिंदेंच्या शिवसेनेचा विजयोत्सव साजरा झाला.

----------------

### पराक्रम दिनानिमित्त पंतप्रधान

करण्यासाठी भारतात कोणते उपक्रम हाती घेतले आहेत याबद्दल विचारले. या प्रश्नावर एका मुलीने उत्तर दिले की, देशात इलेक्ट्रिक वाहने आणि बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. या प्रश्नोत्तरादरम्यान, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना हवामान बदलाचा सामना करण्यासाठी एक साधन म्हणून पंतप्रधान सूर्य घर योजनेबद्दल समजावून सांगितले. या योजनेचा एक भाग म्हणून घराच्या छतावर सौर पॅनेल बसवण्यात येतात. हे पॅनल सौर उर्जेद्वारे वीज निर्मिती करतात त्यामुळे वीज बील भरण्याचे राहत नाही. वैयक्तिक वापरानंतर घरी निर्माण होणारी अतिरिक्त वीज सरकारला विकता येते. सरकार ही वीज खरेदी करून त्याचा आर्थिक मोबदला देते, अशी माहिती पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिली. तसेच इलेक्ट्रिक वाहनांमुळे इंधनावरील खर्च कमी होईल आणि प्रदूषण कमी होईल, असेही ते म्हणाले.

---------------

### परळीच्या भरत गीते यांच्या टॉरल इंडिया

यासाठी ५०० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक केली जाणार असून १२०० पेक्षा अधिक रोजगारांची याद्वारे निर्मिती होणार आहे. दरम्यान या ना त्याकारणाने मागील काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेल्या परळी तालुक्यातील नंदागौळ या छोट्याशा गावचे सुपुत्र असलेले भरत गीते यांनी आंतरराष्ट्रीय दर्जावर आपल्या टरल इंडिया या कंपनीची छापून ठेवली असून त्या कंपनीचे महाराष्ट्र मध्ये दोन प्रकल्प उभारत रोजगार निर्मितीत तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देत असल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अभिमान आणि आनंदाचा हा क्षण असल्याचे म्हणत भरत गीते यांचे कौतुक केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ही संधी उपलब्ध करून समस्त परळीकरांना हा बहुमान प्राप्त करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांचे देखील धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त करत भरत गीते व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

-------------

### शरद पवार अजित पवार

गेल्या काही दिवसांपूर्वी बारामती येथे कृषी प्रदर्शनाच्या निमत्ताने शरद पवार आणि अजित पवार एकाच मंचावर आले होते. मात्र, दोघांनीही एका व्यासपीठावर येऊन एकमेकांना बघितले सुद्धा नाही. आता पुन्हा एकदा गुरूवारी हे दोघे पुन्हा एकाच मंचावर आले. दोघांची बैठक व्यवस्था शेजारी शेजारीच करण्यात आली होती मात्र अजित पवारांनी ती बदलून घेतली. शरद पवार आणि अजित पवार या दोघांच्यामध्ये बाबासाहेब पाटील बसले होते. याच व्यासपीठावर इतर मान्यवरांची करण्यात आलेली आसन व्यवस्था देखील सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. अजितदादांच्या उजव्या हाताला जयंत पाटील बसले होते. तर शरद पवार यांच्या बाजूला त्यांचे जूने सहकारी दिलीप वळसे पाटील बसलेले होते. जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात चर्चा होताना यावेळी दिसली. दरम्यान कै. वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट कारखाना पुरस्कार अहिल्यानगर येथील अंबालिका शुगर्स प्रायव्हेट लिमिटेड अंबिकानगर यांना जाहीर करण्यात आला.

----------------

### खांबा ग्रामस्थांचे औदार्य; भगवानगडाला

भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५



## क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम

बीड - भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय समारंभ रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी पोलिस मुख्यालय मैदानावर क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण समारंभ होत आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता संपन्न होणार आहे. दोन्ही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.३० वाजेपूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. यासह जिल्हयात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून अपर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथील धजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ अपर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सकाळी ९.१५ वाजता तसेच सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

# अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत दारू भट्ट्यावर धाड

## ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त;९ आरोपीवर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अप्पर पोलीस अधीक्षक तिडके यांच्या पथकाने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील वान नदीपात्रातील डोंगरदऱ्यात सुरू असलेल्या दारू भट्टयावर धाड टाकून ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ९ आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की बीड जिल्हा पोलिस अधीक्षक पदी नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्या पासून जिल्ह्यातील अवैध धंदे बंद होत असतानाच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मध्ये आजही स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या कृपेने अवैध धंदे सुरूच असून याच पोलीस स्टेशन हद्दी मध्ये वान नदी पात्रात आज ही गावठी दारू भट्टया सुरूच आसून दिनांक २२.१.२०२५ रोजी दुपारी दीड वाजता अप्पर पोलीस अधीक्षक यांना माहिती मिळाल्या वरून त्या स्वतः, वाचक सपोनी ठाकूर तसेच कार्यालयातील स्टाफ यांना व दोन



पंच बरोबर घेऊन वाना नदी पात्रात त्याचबरोबर नागनाथ मंदिराच्या परिसरात वेगवेगळ्या टीम करून अडीच वाजता छापा मारला असता त्या ठिकाणी काही इसम हे हातभट्टी दारू च्या भट्टया लावून दारू तयार करीत असल्यास निदर्शनास आले. त्या ठिकाणी अचानक छापा मारला असता दोन आरोपी जाग्यावर मिळून आले व दारूची वाहतूक करण्यासाठी एक घोडा व एक मोटरसायकल तसेच काही आरोपी डोंगरदऱ्याचा आश्रय घेऊन पळून गेले. मिळून आलेल्या दोन आरोपींची नावे पुढील प्रमाणे १) बाबा कासम पप्पू वाले २) मुस्तफा बाबा पप्पू वाले असे दोन आरोपी मिळून आले त्यांच्याकडे पळून गेलेले आरोपींची नाव गाव विचारले असता ते पुढील प्रमाणे १) राजू गंगा चौधरी नंबर २) अरे चंदू साखर वाले ३) अब्दुल जुम्मा चौधरी ४) इबुकसिम नुरीवाले ५) लल्लू कासम पप्पू वाले ६) नदीम लुल्स वाले ७) मगबुल राणू परसुवाले तर सर्व राहणार गवळीपुरा अंबाजोगाई. वरील एकूण ९ आरोपीकडून तयार दारू व फसफसते रसायन तसेच एक घोडा व एक मोटरसायकल असे मिळून तीन लाखाचा मुद्देमाल जप्त केला सदरची कारवाई ही अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सोबत सपोनी ठाकूर पोह देवकते सातपुते सुरवसे, पठाण, तागड यांनी केली.

## बुद्धीला वाचनाची तर,शरीराला खेळाची आवश्यकता -सखाराम वनवे



वडवणी । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता. धारूर जि.बीड या शाळेमध्ये क्रीडा सप्ताहाचे आयोजन आदिवासी विकास विभाग अंतर्गत प्रकल्प छत्रपती संभाजी नगर,प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती.चेतना मोरे मॅडम,सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.उद्धव वायाळ सर व श्री.विनोद सांगळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उद्घाटन..!पर खो-खो या खेळाचा सामना.(वीर बिरसा व एकलव्य) या दोन टीम मध्ये सर्व गुरुजनवर्गाच्या उपस्थित मध्ये सामन्याची सुरुवात करून क्रीडा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. या क्रीडा सप्ताहामध्ये हॉलीबॉल, खो-खो,कबड्डी,लिंबू चमचा,संगीत खुर्ची, तीन टांगी दौड,थैली रेस,लंगडी, रनिंग, रांगोळी स्पर्धा अशा विविध प्रकारच्या खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटन महोत्सवाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सरांनी ज्याप्रमाणे बुद्धीला वाचनाची गरज आहे अगदी तशाच प्रकारे..! आपल्या शरीराचे आरोग्य तंदुरुस्त व शरीराचे स्नायू बळकट होण्यासाठी खेळाची आवश्यकता आहे. या क्रीडासप्ताहाचा सर्व विद्यार्थी खेळाडूंनी आनंद घ्यावा असे,विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील शिक्षक श्री.परमेश्वर तावसे( माजी मुख्याध्यापक),श्री. नागनाथ चात्रे,श्री.प्रकाश काडलिंगे,श्री.विनायक कुलकर्णी,श्रीमती डोंगरे सारिका मॅडम,श्रीमती.पुनम लांब मॅडम,श्री भारत बडे,श्री.शिवाजी घुले,श्री. हनुमान केंद्रे हे सर्व गुरुजन वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## नियंत्रण सुटलेल्या टेम्पोने आराधी महिलेस चिरडले

### अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवी मंदिर परिसरातील दुर्घटना

अंबाजोगाई -प्रतिनिधी

येथील श्री योगेश्वरी देवी मंदिराच्या मुकुंदराज रोडवरील प्रवेशद्वाराजवळ बसलेल्या आराधी महिलेचा टेम्पोने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. हि घटना बुधवारी (दि.२२) दुपारी घडली.



केसरबाई धोंडीराम जोगदंड (वय ६५, रा. परळी वेस, समता नगर, अंबाजोगाई) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केसरबाई बुधवारी दुपारी श्री योगेश्वरी देवी मंदिराच्या मुकुंदराज रोडवरील प्रवेशद्वाराजवळ बसल्या होत्या. यावेळी मंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमाच्या खुर्च्या व इतर साहित्य नेण्यासाठी टेम्पो (एमएच २८ बीबी ३२२७) आला होता. सामान भरून गेटच्या बाहेर जात असताना चालकाचे टेंपोवरील नियंत्रण सुटले व टेम्पो थेट केसरबाई जोगदंड यांच्या अंगावरून जाऊन भिंतीला धडकला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या केसरबाई जोगदंड यांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने टेम्पो तिथेच सोडून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. पुढील तपास शहर पोलीस करत आहेत.

## महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या राज्य सचिवपदी ॲड.जाधव

बीड । प्रतिनिधी

ॲड.जाधव हे पोलीस बॉईज संघटने मध्ये मराठवाडा अध्यक्ष पदावर कार्यरत होते. या पदावर असताना पोलिसांचे विविध प्रकारचे प्रश्न, पोलीस पाल्यांच्या समस्या , पोलीस परिवाराचे प्रश्न सोडवण्यासाठी काम केले.ही संघटना पूर्ण महाराष्ट्रात काम करत असून, पोलिसांचे विविध प्रकारचे प्रश्न असतील. त्यात त्यांना वैद्यकीय सुविधा, पोलीस पाल्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असेल, त्यांचा राहण्याचा प्रश्न असेल यासाठी वेळोवेळी मा. गृहमंत्री यांना पाठपुरावा करून त्या मागण्या मान्य व्हाव्या यासाठी प्रयत्न केले.तसेच इतर सामाजिक कार्यात देखील मा. राहुल दुबाले यांचा मार्गदर्शनाखाली उत्तम काम करत आलेले असून. ते वकिली क्षेत्रा मध्ये देखील उत्तम अशा प्रकारे आपली सेवा देत आहेत.



त्यांचा या शिक्षणाचा फायदा या पदावर काम करत असताना नक्कीच संघटनेला व पोलीस कर्मचाऱ्यांचे, पाल्यांच्या व परिवाराचे प्रश्न सोडवण्यासाठी होईल. मा.राहुल दुबाले(संस्थापक अध्यक्ष )यांचा मार्गदर्शनाखाली ॲड.आदर्श जाधव यांची निवड करण्यात आली. त्यांचा या निवडीबद्दल सर्व मित्र परिवार तर्फे सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

## प्रजासत्ताकदिनी रंगणार बालझुंबड-२०२५ च्या विजयी स्पर्धकांचा पारितोषिक वितरण सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग पंचविसाव्या बालझुंबड , स्नेह मिलन तथा उत्सव विद्यार्थ्यांचा -२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे हे पंचविसावे वर्ष असल्याने या स्पर्धेचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या स्नेहमिलन उत्सवात अंबाजोगाई तालुक्यातील अनेक शाळा व शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. दिनांक ३ जानेवारी ते ८ जाने २०२५ या दरम्यान रौप्य महोत्सवी बालझुंबडचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना एक व्यासपीठ मिळून त्यांना चालना मिळाली . प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी व सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी व संचालक संकेत मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली हा विद्यार्थ्यांचा स्नेहमीलन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यातील विजेत्या व गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा रविवार दि २६ जानेवारी २०२५ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी चार वाजता संपन्न होणार आहे. तेव्हा तालुक्यातील सर्व विजेत्या शाळा व विजेत्या विद्यार्थ्यांनी या गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




मागील २४ वर्षापासून बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाई शहरात अखंडीतपणे राबविण्यात येत आहे . प्रतिवर्षी तालुक्यातील सर्व शाळां या उपक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद देत असतात. याहीवर्षी तालुक्यातील अनेक शाळा यामध्ये सहभागी झाल्या होत्या. बालझुंबड हा उपक्रम तालुका स्तरावर आयोजीत केला असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ते नियोजन देखील अतिशय उत्तम रित्या मंडळाच्या वतीने केले होते. बालझुंबड या उपक्रमांतर्गत इ.१ ली ते ४ थी या गटासाठी रंगभरण स्पर्धा, वैयक्तीक नृत्य, समुह नृत्य, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी पी.पी.टी. स्पर्धा ( ), प्रश्नमंजुषा स्पर्धा ( ), चित्रकला, वैयक्तीक नृत्य, समुहनृत्य स्पर्धा व विज्ञान शोध स्पर्धा ( ) आयोजित करण्यात आलेल्या होत्या. अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास ७० ते ८० शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळांच्या माध्यमातून उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला होता. बालझुंबड या उपक्रमाच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गुणी कलावंत तयार झाले असून ते नाटक, सिनेमा तसेच क्रीडा क्षेत्राद्वारे आपली छाप अवघ्या महाराष्ट्राभर उमटवत आहेत. तेव्हा बालझुंबड ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी केवळ एक स्पर्धा नसून एक पर्वणीच ठरल्या जात आहे. यामध्ये सर्व स्पर्धकांना विनामूल्य असा प्रवेश देऊन या बालझुंबड चे सर्व कार्यक्रम न्यू व्हिजन पब्लिक स्कुल तसेच विलासराव देशमुख सभागृह त्याचबरोबर मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाले होते. या स्पर्धेतील सर्व विजेत्या व गुणीजण विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षक व पालकांसह उपस्थित रहावे असे अवाहन प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सचिव दिनकर जोशी तथा संचालक संकेत मोदी यांनी केले आहे.

## प्रजासत्ताकदिनी रक्तदान शिबीराचे आयोजन तहसिल कार्यालयाचा अभिनव उपक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**

**सन २०१६-१७ साली आपल्या देशाला १९ लाख युनिट्स रक्ताचा तुटवडा भासला होता.सन २०१५-१६ साली ही संख्या ११ लाखांवर होती.यावरुन किती मोठ्या प्रमाणावर रुग्णालयामध्ये रुग्णांना रक्ताची गरज आहे.हे लक्षात येते.आज रोजी प्रत्येक वर्षी भारतामध्ये ०५ कोटी युनिट्स रक्ताची गरज भासते.या सर्व गोष्टीचा विचार केल्यास दररोज ३८ हजारहून अधिक रक्तदान शिबीरे आयोजित करायला हवीत.म्हणूनच प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आष्टी तहसिल कार्यालयाने रक्तदान शिबीराचे आयोजन केले असून प्रत्येक नागरिकाने या रक्तदान शिबीरामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.**

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले की, सध्याच्या स्थितीत आपल्याला रक्त आणि रक्तदान शिबीराचे महत्व लक्षात येते.आपण केलेल्या रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांचे जीवन वाचवीता येते. त्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असे नेहमी संबोधले जाते.त्या अनुषंगाने २६ जानेवारी २०२५ या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त तहसिल कार्यालय आष्टी येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन दि. २६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.आयोजित केले आहे.या रक्तदान शिबीरामध्ये आष्टी तालुक्यातील सर्व कार्यालय प्रमुख व अधिकारी कर्मचारी,सर्व सेतु सुविधा केंद्र चालक,महसूल प्रशासनातील ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहायक, सहायक महसूल अधिकारी, महसूल सेवक व तालुक्यातील जनतेने सहभागी होऊन आपण स्वतःही रक्तदान करावे व आपले सोबत शक्य झाल्यास जास्तीत जास्त लोकांना सदर रक्तदान शिबीरामध्ये सहभाग नोंदवून रक्तदान करण्यास प्रोत्साहीत करावे.असे आवाहन वैशाली पाटील तहसिलदार यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी परिवंत गायकवाड

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव २०२५ साजरा करण्यासाठी भिमनगर मधील संकल्प बुद्ध विहारात आष्टी येथील सर्व भिम प्रेमी यांची मंगळवार दि २१ जानेवारी रोजी बैठक घेण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ युवराज तुपारे यांच्या अध्यक्षतेखाली जयंती समीती स्थापन करण्यात आली.यावेळी सर्वानुमते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी प्रविंत गायकवाड यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी माधव कांबळे यांची तर सचिवपदी नवनाथ लोंढे, सहसचिवपदी राहुल वाल्हेकर,कोषाध्यक्षपदी सिताराम घोडके यांची निवड करण्यात आली.या बैठकीला नगरसेवक अरूण निकाळजे,माजी नगरसेवक दिपक निकाळजे,राजु निकाळजे,रूपेश निकाळजे, मिलिंद निकाळजे, शशिकांत निकाळजे, सादिक कुरेशी,ॲड प्रबोधन निकाळजे, ॲड राजाभाऊ निकाळजे,अशोक आण्णा निकाळजे, रत्नकांत निकाळजे, प्रदीप पगारे, नारायण निकाळजे, प्रकाश निकाळजे,दिलीप निकाळजे,सनी काळपुड,कुणाल निकाळजे, शंकर निकाळजे,संदिप पगारे, नितिन निकाळजे, सचिन निकाळजे,गणेश गायकवाड,रुपेश कांबळे,अनिकेत रमेश निकाळजे, ॲड किशोर निकाळजे,अजय निकाळजे,युवराज निकाळजे, किशोर निकाळजे,संदेश निकाळजे,बबलू निकाळजे, सौरभ निकाळजे,ऋतिक निकाळजे, नेल्सन निकाळजे,अक्षय मुन्ना निकाळजे, निखिल शिंदे, योगेश तुपारे, सुजित निकाळजे,नीरज निकाळजे,सुमित शिंदे,यांच्यासह यावेळी सर्व भिम प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान ६ वरून...

### वडवणीत रंगणार वडवणी

दिनांक २५ जानेवारी २०२५ शनिवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.रामचंद्र महाराज निकम यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य डॉ.पारसमल पन्नालाल नहार यांचे आहे. दिनांक २६ जानेवारी २०२५ रविवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.शिवा महाराज बावस्कर यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य माजी नगराध्यक्ष राजाभाऊ मुंडे यांचे आहे. दिनांक २७ जानेवारी २०२५ सोमवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.विशाल महाराज खोले यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य कै.रुक्मिणी कृष्णा आप्पा यांच्या स्मरणार्थ मिनाबाई नवनाथ रोकडे यांचे आहे. दिनांक २८ जानेवारी २०२५ मंगळवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य सहदेव मुंडे व हनुमंत सांगळे यांचे आहे. दिनांक २९ जानेवारी २०२५ बुधवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील यांची असणार आहे तरी यासाठी सौजन्य नगराध्यक्ष शेषेराव जगताप व उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांचे आहे. दिनांक ३० जानेवारी २०२५ गुरुवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.पारस महाराज मुथ्था यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य उद्योजक माणिकचंद नहार यांचे आहे. दिनांक ३१ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.पांडुरंग महाराज साळुंके यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य गोरख मुंडे यांचे आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य पांडुरंग लांडे यांचे आहे. वरील सर्व कीर्तन सेवा दररोज रात्री ८ ते १० या वेळेत संपन्न होतील. तर दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर वडवणी शहरातील दिवंगत वस्त्रोद्योजक स्व.विश्वासराव नाथराव आसलकर यांच्या स्मरणार्थ समस्त आसलकर परिवार यांजकडून महाप्रसाद संपन्न होईल. हा संपूर्ण कीर्तन महोत्सव वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे स्व.गोपीनाथराव मुंडे चौक येथील मैदानात पार पडणार आहे. तरी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या अध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त ग्रामस्थ वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ३१ व्या वर्षी परंपरां राखत

शिर्डीच्या दिशेने चनई मुक्कामी मार्गस्थ झाला. या सोहळ्यात जिल्ह्यातून शेकडो साईभक्त सहभागी झाले आसुन हा सोहळा धारुर,वडवणी,बिड,गेवराई, उमापूर, शेवगाव, नेवासा, श्रीरामपूर, राहता मार्गे १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता शिर्डीत पोहचणार आहे. सोहळा यशस्वीतेसाठी पालखी अध्यक्ष हभप गोकुळ महाराज वैष्णव, हभप सुंदरराव सोनवने वडवणीकर, संतोष महाराज राऊत, दादा राऊत केजकर, जिजा रामावत, विजय शितोळे, सुशील जोशी, प्रमोद पोखरकर, बबलू भराडीय,वाजेदबाब पठाण, भिम वैष्णव, सुनील लखेरा, अभिमन्यू वैष्णव,भास्कर निकम, संतोष पवार, सुखदेव शिंदे,रिंकू चव्हाण प्रयत्न करत आहेत. पालखी सोहळ्यात कांही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी शहर व ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंधोबस्त ठेवण्यात आला होता.

### हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब

बाबा सराफ यांच्या आयोजना खाली धारूर येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आले.

युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजनाखाली वडवणी तालुका मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही,पेन वाटप करण्यात आले.

शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोनाखाली बीड शहरातील भगवान विद्यालय शेजारी ध्येयपूर्ती गुरुकुल येथे २० तारखेपासून सुरू असलेल्या वकृत्व स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,अशा अनेक स्पर्धांचे बक्षीस वितरण करून सर्व विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले.

याबरोबरच बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रम घेत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सर्व बीड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहात पार पाडली.

### घाटनांदुर गणातून भाजप

आधारित भाजप सरकारने शाश्वत विकास साधला आहे. ग्रामीण शहरी व आर्थिक क्षेत्रात प्रगतीचा हा दृष्टिकोन विकसित करणे प्रत्येक घटकाला समान हक्क मिळवून देणे, युवकांनी रोजगार निर्मिती शिक्षणावर सुधारणा व महिला सक्षमीकरण हे मुख्य ध्येय असून भारतीय जनता पक्षाची सभासद झाल्यास सभासत्वामुळे आपल्याला पक्षाच्या धोरणांमध्ये सक्रिय भूमिका बजावण्याची संधी मिळेल असे भाजपा युवा मोर्चा उप तालुका अध्यक्ष प्रदीप भैय्या वैद्य म्हणाले.यावेळी घाटनांदुर पंचायत समितीतील युवकांनी उत्स्फूर्त असा सभासद नोंदणी प्रक्रियेला प्रतिसाद देत आहेत.

### भ्रष्ट कर्मचाऱ्यांना

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व संगणक परिचालक यांच्या विरुद्ध तक्रार करत तक्रारीची चौकशी व कार्यवाही करण्याकरिता कळविले आहे. तसेच सदर चौकशी न झाल्यास अर्जदार हे दिनांक २३/१/२०२५ रोजी जिल्हा कार्यालयासमोर बेमुदत अमोल उपोषण करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

तेव्हा संबंधितांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी व नियमानुसार योग्य ती कारवाई करून त्याचा अहवाल संबंधित तास व कार्यालयास विना विलंब सादर करावा. तसेच संबंधितास उपोषणासारख्या मार्गावरून परावृत्त करावे असे पत्र देण्यात आले होते मात्र गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांना तक्रारीचे व पत्राचे गांभीर्य नसून चौकशी करून कारवाई अहवाल सादर करण्यास व तक्रारदारास अहवाल सादर करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांनी अद्यापही कार्यालयास व तक्रारदारांना अहवाल सादर केला नाही.

### प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर

परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर पद मिळवले. दामिनी अश्वारोहन, कराटे, योगा, रायफल शूटिंग, तसेच खो-खो आणि व्हॉलीबॉलमध्येही प्राविण्य मिळवली आहे. ती कराटेमध्ये ब्लॅक बेल्टची सुवर्णपदक विजेती आहे.

ध्वजारोहण दरम्यान पुष्पवृष्टी करणार

२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी राष्ट्रपती ध्वजारोहण करतील त्यावेळी ध्वजाला मानवंदना देण्यासाठी विमानातून पुष्पवृष्टी करण्याची जबाबदारी फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख यांना सोपविली आहे.

# शेतकरी नेते २६ जानेवारी रोजी पंजाबमधील भाजप नेत्यांच्या घराला घालणार घेराव

चंदिगढ : शेतकऱ्यांचा मोठा मोर्चा काढण्यात येणार असून कॉर्पोरेट आणि भाजप नेत्यांच्या घराला घेराव घालण्यात येणार आहे, असे पंढेर यांनी सांगितले. पंढेर पत्रकार परिषदेत बोलत होते.

हरियाणा - पंजाबच्या सीमेवर हमीभाव गॅरंटी कायद्यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या शेतकरी नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. २६ जानेवारी रोजी पंजाबमधील शॉपिंग मॉल आणि भाजप नेत्यांच्या घराला घेराव घालण्याची घोषणा केली आहे. यासंदर्भात बोलताना शेतकरी नेते सर्वणसिंग पंढेर म्हणाले, ''शेतकऱ्यांची मोठा मोर्चा काढण्यात येणार असून कॉर्पोरेट आणि भाजप नेत्यांच्या घराला घेराव घालण्यात येणार आहे, असं पंढेर यांनी सांगितलं. शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल यांच्या उपोषणासमोर केंद्र सरकारने गुडघे टेकले असून चर्चेसाठी तयारी दाखवली आहे. त्यानंतर डल्लेवाल यांनी वैद्यकीय उपचार घेण्यास होकार दिला. यावेळी त्यांच्यावर डॉक्टरांनी उपचारही



सुरू केले. अद्यापही डल्लेवाल यांचे उपोषण सुरूच आहे. डल्लेवाल यांच्या उपोषणाचा आज ५८ व्या दिवस आहे. परंतु खनौरी सीमेवर डल्लेवाल यांना वैद्यकीय उपचार करण्यास सरकारी डॉक्टरांनी नकार दिल्याने चर्चेला उधाण आलं आहे.

डल्लेवाल यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर्सने एक पत्र लिहून वैद्यकीय उपचार देण्यास नकार दिला. यामध्ये एक कनिष्ठ आणि वरिष्ठ डॉक्टरांचा समावेश आहे. डल्लेवाल यांच्यावर उपचार करताना आंदोलक शेतकऱ्यांनी छळ केल्याचा आरोप डॉक्टरांनी केला आहे. तसेच माध्यमातील पत्रकार आणि डल्लेवाल यांच्या समर्थकांनी शिवीगाळ केल्याचंही पत्रात लिहिलं आहे. यावर सर्वणसिंग पंढेर यांनी डॉक्टरांच्या छळाबद्दल काहीच माहिती नसल्याचे सांगितले. दरम्यान, १८ जानेवारी रोजी कृषी मंत्रालयाचे संयुक्त सचिव प्रिय रंजन यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चस्तरीय केंद्रीय मंडळाने खनौरी सीमेवर जाऊन डल्लेवाल यांच्याशी चर्चा केली. शेतकरी नेत्यांशी १४ फेब्रुवारीपासून चंडीगढ येथे पुन्हा एकदा चर्चासत्र सुरू करण्यासाठी निमंत्रण दिलं. त्यावरून डल्लेवाल यांनी प्रस्ताव स्वीकारत वैद्यकीय उपचारास सहमती दिली आहे.

# ओरेगॅनोची लागवड करुन मिळवा चांगले उत्पन्न



आधुनिकीकरणामुळे लोकांच्या राहणीमानात आणि खाण्याच्या सवयींमध्ये बदल झाला आहे. आता पारंपरिक पिकांऐवजी औषधी, विविध प्रकारच्या पानांची मागणी खूप वाढली आहे. शेतकऱ्यांनी या जागतिक पिकांचे उत्पादनही सुरू केले आहे, त्यामुळे पिकांना चांगला भाव मिळतो. ओरेगॅनो हे असेच एक पीक आहे. बाजारात ओरेगॅनोची मागणी वाढू लागली आहे. पूर्वी फक्त पिझ्झा, पास्ता यांसारख्या इटालियन खाद्यपदार्थांमध्ये याचा वापर केला जात होता, परंतु आता सर्व प्रकारच्या खाद्यपदार्थांमध्ये त्याचा वापर केला जात आहे. अशा परिस्थितीत शेतकरी ओरेगॅनोची लागवड करून चांगला नफा मिळवू शकतात.

ओरेगॅनो म्हणजे काय?

ओरेगॅनो पुदीना कुटुंबातील एक सदस्य आहे. ही कुटुंबातील एक वनस्पती आहे. काही भागात त्याला वन तुळशी म्हणतात. त्याची फुले गुलाबी, जांभळ्या आणि पांढऱ्या रंगाची असतात, त्याची चव ओव्याप्रमाणे तेज असते. त्यात अनेक प्रकार आहेत. यापासून तेलही बनवले जाते. ओरेगॅनो लागवडीसाठी योग्य माती आणि हवामान जाणून घेऊया- ६ ते ८ पीएच मूल्य असलेली कोरडी, वालुकामय जमीन ओरेगॅनो लागवडीसाठी योग्य आहे, मातीचा निचरा चांगला असावा. त्याच्या लागवडीसाठी उष्णता आणि अधिक सूर्यप्रकाश आवश्यक आहे. थंड हवामानात दंव संरक्षण आवश्यक आहे.

शेताची तयारी :ओरेगॅनो पेरण्यापूर्वी शेताची पूर्णपणे नांगरणी करा. कल्टिव्हेटर चालवा जेणेकरून माती भुसभुशीत होईल किंवा नंतर पेलवा बनवा. यानंतर जमिनीत सेंद्रिय पदार्थ असलेले कंपोस्ट टाकावे. ओरेगॅनोच्या चांगल्या वाढीसाठी दाणेदार सेंद्रिय खत वापरा.

लागवड पद्धत :ओरेगॅनो दोन प्रकारे शेतात लावता येते. प्रथम बियाणे पद्धतीने, दुसरे ग्राफ्टिंग पद्धतीने. बियाणे पद्धतीने पेरणी करण्यासाठी बियाणे १२ ते १५ इंच अंतरावर शेतात लावावे. ओरेगॅनो झाडे पसरतात, त्यामुळे बियांमधील अंतर महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, ग्राफ्टिंग पद्धतीने पेरणी करण्यापूर्वी, झाडांच्या कटिंगमध्ये मुळे वाढवणे आवश्यक आहे. मुळे बाहेर आल्यानंतरच प्रत्यारोपण करा.

बिया/वनस्पती कोठे मिळतील : तुम्हाला ओरेगॅनोच्या विविध जातींचे बिया ऑनलाइन मिळतील, त्याशिवाय तुम्ही जवळच्या रोपवाटिकेतूनही माहिती मिळवू शकता.वनस्पतींमध्ये सिंचन :ओरेगॅनो झाडांना कमी सिंचनाची आवश्यकता असते. मात्र, रोप लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे, त्यानंतर माती पूर्णपणे कोरडी झाल्यानंतर पाणी द्यावे. शेतात पाणी साचू नये याची काळजी घ्यावी.

रोपांची निगा :ही झाडे १ ते २ फूट उंच असतात. जेव्हा झाडे ४ इंच उंच असतात, तेव्हा काही पाने तोडून घ्या आणि नियमित छाटणी करा. मृत देठ कापत रहा.

काढणी :फुलांच्या नंतर झाडांची चव बदलते, म्हणून फुलांच्या आधी पाने काढणी करा. यानंतर पाने गोळा करून गुठळ्या तयार करून वाळवाव्यात. या वाळलेल्या पानांचे भाव बाजारात चांगले आहेत. याशिवाय ओल्या पानांपासून सर्व प्रकारच्या सॉस आणि चटण्या बनविल्या जातात, ज्यांना बाजारात चांगली मागणी आहे, तसेच ओरेगॅनोचे तेलही बनवले जाते. त्याच्या लागवडीसह, आपण प्रक्रिया युनिट स्थापित करून अनेक पटींनी नफा मिळवू शकता.

# उन्हाळी सोयाबीन लागवड तंत्रज्ञान

सध्या सोयाबीनला चांगला दर मिळत असल्याने यंदा अनेक शेतकरी उन्हाळी सोयाबीन करण्याच्या विचारात आहेत. उन्हाळी सोयाबीन लागवड ही प्रामुख्याने खरिपातील बीजोत्पादनासाठी केली जाते. पण काही शेतकरी उन्हाळी सोयाबीन करून त्यातून चांगला नफाही कमावत आहेत. उन्हाळी सोयाबीनची लागवड नक्की कधी करावी? कोणतं वाण निवडावं? अन उन्हाळी सोयाबीनचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत शेतकऱ्यांमध्ये बऱ्याचदा संभ्रम असतो. यासाठी याची माहिती ठेवल्यास चांगला फायदा होतो.

जमीन :सोयाबीन लागवडीसाठी मध्यम ते भारी जमीन आवश्यक आहे. अत्यंत हलक्या जमीनीत सोयाबीनचे अपेक्षित उत्पादन येत नाही . जास्त आम्लयुक्त, क्षारयुक्त तथा रेताड जमीनीत सोयाबीनचे पीक घेऊ नये. जमीनीत सेंद्रिय कर्बाची मात्रा चांगल्या प्रमाणात असली पाहिजे

वाण :पेरणीसाठी किमान ७० टक्के उगवणक्षमता असलेले बियाणे आवश्यक आहे. पेरणीसाठी वनामकृवि, परभणीने विकसीत केलेल्या एमएयुएस ७१, एमएयुएस १५८ व एमएयुएस ६१२ या वाणांची किंवा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने विकसीत केलेल्या केडीएस ७२६, केडीएस ७५३ या वाणांची किंवा जवाहरलाल नेहरु कृषी विश्वविद्यालय, जबलपूर ने विकसीत केलेल्या जेएस ३३५, जेएस ९३-०५, जेएस २०-२९, जेएस २०-६९, जेएस २०-११६ या वाणांची निवड करावी.

जमीनीची पूर्व मशागत :खरीप हंगामातील पिकाच्या काढणीनंतर नांगरणी करुन विरुध्द दिशेने मोगडणी करावी व नंतर पाटा मारुन जमीन समतोल करावी .

बिजप्रक्रिया, पेरणी, खते व आंतरमशागत :बिजप्रक्रिया:- सोयाबीनवर विविध रोग येतात व त्यामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. रोग आल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी घेण्यापेक्षा पेरणीपूर्वीच बिन प्रक्रिया केल्यास रोगाचे व्यवस्थापन व्यवस्थीतरित्या होते. सोयाबीन बियाण्यास पेरणीपूर्वी मिश्न उत्पादन कार्बोक्झीन ३७.५ % + थायरम ३७.५ % ची ( व्यापारी नाव व्हिटावॅक्स पॉवर) ३ ग्रॅम प्रति कि.ग्रॅ बीज प्रक्रिया करावी.



पेरणी -उन्हाळी हंगामी सोयाबीनच्या बिजोत्पादनाकरिता डिसेंबरचा शेवटचा आठवडा ते जानेवारी पर्यंत पिकाची पेरणी करावी. जर पेरणीस उशीर झाला तर पिक फुलोऱ्यात असतांना व दाणे भरण्याच्या अवस्थेत असतांना म्हणजेच मार्च व एप्रिल महिन्यात जास्त तापमानामुळे फुले शेंगा गळ होते व दाण्याचा आकार लहान होतो. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होऊ शकते.

लागवडीचे अंतर व पध्दत :सोयाबीनची पेरणी ४५ बाय ५ सें.मी. अंतरावर व २.५ ते ३.० सें.मी. खोलीवर करावी. पेरणीच्या वेळेस बियाणे जास्त खोलीवर पडल्यास व्यवस्थित उगवण होत नाही. बियाण्याचे प्रमाण - सोयाबीन लागवडीसाठी हेक्टरी ६५ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे (एकरी २६ किलो).

खते :उन्हाळी हंगामात पाणी देण्यामध्ये खंड पडल्यास पोटॅशियम नायट्रेटच्या दोन फवारण्या अनुक्रमे ३५ व्या व ५५ व्या दिवशी १०० ग्रॅम पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी . पेरणीनंतर नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा तसेच माती परिक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा कमी जास्त करावी . पिक २० ते २५ दिवसाचे असतांना जर सुक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे पिवळे पडल्यास मायक्रोला (ग्रेड -२) या सुक्ष्मअन्नद्रव्यांची ५० ते ७५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी . पिक शेंगा लागण्याच्या अवस्थेत असतांना १ ९ : १ ९ : १ ९ या लिक्विड रासायनिक खताची १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये टाकून फवारणी करावी तसेच शेंगा भरण्याच्या अवस्थेत असतांना ०:५२:३४ या लिक्विड रासायनिक खताची १०० ग्रॅम प्रति १० लिटर १० लिटर.

काढणी व मळणी :शेंगा पिवळ्या पडून पक्व होताच पीकाची काढणी करावी. कापणी नंतर पिकाचे छोटे छोटे ढीग करुन २-३ दिवस उन्हात चांगले वाळवून मळणी यंत्राची गती कमी करुन मळणी करावी व बियाण्याच्या बाह्य आवरणाला ईजा पोहचणार नाही याकडे लक्ष द्यावे. मळणी करतांना बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फेऱ्यांची गती ४०० ते ५०० फेरे प्रति मिनीट इतकी ठेवावी व बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १३ टक्के पर्यंत असेल तर गती ३०० ते ४०० फेरे प्रति मिनीट इतकी ठेवावी . साधारणत : उन्हाळी हंगामामध्ये तयार झालेल्या बियाण्याचा रंग पिवळसर हिरवट असतो.

साठवण : मळणी नंतर बियाणे ताडपत्री / सिमेंटच्या खळ्यावर पातळ पसरुन बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १० ते १२ टक्के पर्यंत आणावे . बियाणे स्वच्छ करुन पोत्यात भरुन साठवण करावी . साठवणीचे ठिकाण थंड , ओलावारहित व हवेशीर असले पाहिजे . साठवण करतांना एकावर एक चार पेक्षा जास्त पोती ठेवू नये.




## जागतिक दिवस

## राष्ट्रीय बालिका दिवस

### महत्वाच्या घटना

१८४८ : कॅलिफोर्निया गोल्डरश कॅलिफोर्नियातील सटर्स मिल येथे एका ओढ्यात जेम्स मार्शल नावाच्या माणसाला मोठ्या प्रमाणात सोने सापडले. या बातमीमुळे जगभरातून लाखो लोक सोने मिळवण्यासाठी कॅलिफोर्नियात दाखल होऊ लागले.
१८५७ : दक्षिण आशियातील पहिल्या विद्यापीठाची कोलकाता येथे स्थापना झाली.
१८६२ : बुखारेस्ट ही रुमानियाची राजधानी करण्यात आली.
१९०१ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला.
१९१६ : नागरी स्वातंत्र्यावर आक्रमण होते या कारणामुळे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने प्राप्तिकर घटनाबाह्य ठरविला.
१९४२ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी बँकॉकवर बॉम्बहल्ला केला. यामुळे थायलँडला इंग्लंड व अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारणे भाग पडले.
१९४३ : पुण्यातील कॅपिटॉल चित्रपटगृहात बॉम्बस्फोट होऊन चार जण ठार
१९६६ : एअर इंडियाचे 'कांचनगंगा' हे विमान युरोपातील आल्प्स पर्वतातील माँट ब्लँक या शिखरावर कोसळले. या अपघातात भारतातील अणूविज्ञानाचे शिल्पकार डॉ. होमी जहांगीर भाभा यांचे निधन झाले.
१९५० : भारताच्या संविधानावर स्वाक्षरी झाली
१९५१ : प्रेम माथुर ह्या देशाच्या पहिल्या महिला पायलट बनल्या.
१९५२ : मुंबई येथे पहिल्यांदा अंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव साजरा करण्यात आला.
१९६६ : भारताच्या तिसर्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांचा शपथविधी झाला.
१९७२ : गुआममध्ये इ. स. १९४४ पासून लपलेला जपानी सैनिक, शोइची योकोइ सापडला. त्याला दुसरे महायुद्ध संपलेले माहितीच नव्हते.
१९७६ : 'बर्मा शेल' या ब्रिटिश तेलकंपनीचे राष्ट्रीयीकरण करुन तिचे नाव 'भारत रिफायनरीज' असे ठेवण्यात आले. पुढे १ ऑगस्ट १९७७ रोजी त्या कंपनीचे नाव बदलून 'भारत पेट्रोलियम' असे करण्यात आले.
१९८४ : ॲपल मॅकिन्टॉश कॉम्प्युटर्सची विक्री सुरू झाली.
१९९० : जपान ने पहिला हितेन नावाचा लूनर प्रोब प्रक्षेपित केल्या गेला.
१९९६ : अमेरिकेच्या पहिल्या महिल्या हिलेरी क्लिंटन यांना न्यायालयात हाजीर राहण्यास सांगितले.
२००२ : भारतीय उपग्रह इनसेट-३ आपल्या कक्षेत स्थापित झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२६ : पहिले भारतीय बॅरिस्टर ज्ञानेंद्र मोहन टागोर यांचा जन्म.
१८७७ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक पुलिन बिहारी दास यांचा जन्म.
१९२४ : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (मृत्यू: २८ डिसेंबर २००० मुंबई)
१९२४ : रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री, आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). 'सांगत्ये ऐका' नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७१)
१९४३ : सुभाष घई हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक
१९४५ : भारतीय चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक सुभाष घई यांचा जन्म.
१९४५: भारतीय राजनीती तज्ञ प्रदीप भट्टाचार्य यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९६५ : विन्स्टन चर्चिल दुसर्या महायुद्धकाळातील ब्रिटनचे पंतप्रधान, साहित्यिक, वृत्तपत्रकार, थोर राजकारणी आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: ३० नोव्हेंबर १८७४)
१९६६ : एअर इंडियाचे 'कांचनगंगा' हे विमान युरोपातील आल्प्स पर्वतात कोसळुन भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा मृत्यूमुखी पडले. (जन्म: ३० आक्टोबर १९०९)
२००५ : अनुताई लिमये गोवा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राचा लढा यात सक्रीय सहभाग घेणार्या स्वातंत्र्यसेनानी आदिवासी महिला व बालकांच्या कल्याणासाठी झटणार्याव सामाजिक कार्यकर्त्या (जन्म:)
२०११ : स्वरभास्कर पण्डित भीमसेन जोशी शास्त्रीय गायक (जन्म: ४ फेब्रुवारी १९२२)


# आंब्याचे वेळीच करा उपाय अन्यथा होऊ शकते लाखोंचे नुकसान

हिवाळा सुरू झाला की आंब्याच्या झाडांवर मेलीबग्सचे आक्रमण वाढते, त्यामुळे मोहर नीट वाढू शकत नाहीत. अशा परिस्थितीत आंबा उत्पादक शेतकऱ्यांना दरवर्षी मोठा तोटा सहन करावा लागतो. पण आता देशातील ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंह मेलीबग कीटकांना तोंड देण्यासाठी खास उपाय सांगितला आहे. डॉ. सिंग यांच्या म्हणण्यानुसार मेलीबगचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आंब्याच्या झाडांची निगा डिसेंबर महिन्यापासूनच सुरू करावी. मेलीबगच्या नियंत्रणासाठी प्रति झाड २ मिली डाय मिथाइल २० ईसी प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करा. यानंतर आंब्याच्या फांद्यावर शिंपडा. त्यामुळे झाडावर चढणाऱ्या कीटकांच्या संख्येत मोठी घट होते. पण केमिकल कंट्रोल करताना काही गोष्टीही लक्षात ठेवायला हव्यात.

विशेष म्हणजे मित्र कीटकांनाही यामुळे इजा होते. मित्र कीटक सकाळी जास्त सक्रिय असतात. म्हणूनच कीटकनाशकांची फवारणी संध्याकाळी करावी. या मेलीबग कीटकांमुळे आंबा पिकाचे ५० ते १०० टक्के नुकसान होऊ शकते. हे आंबा पिकामध्ये डिसेंबर ते मे या काळात दिसतात.

असे होते नुकसान :

या किडीची निम्फ आणि प्रौढ मादी दोघेही पिकांचे खूप नुकसान करतात. ते फळांचे देठ, फुले, फळे आणि मऊ डहाळ्यांचा रस शोषून आंब्याचे नुकसान करतात. त्याचे वेळीच व्यवस्थापन केल्यास पिकांचे नुकसान टाळता येते. यासाठी यांत्रिक, जैविक व रासायनिक व्यवस्थापन केल्यास पिकाला किडीच्या हल्ल्यापासून वाचवता येते. दुसरीकडे उन्हाळ्यात फळबागा चांगल्या पद्धतीने नांगरून सोडल्या पाहिजेत. त्यामुळे किडीची मादी व अंडी कडक सूर्यप्रकाशाने नष्ट होतात. डिसेंबर, जानेवारी महिन्यात झाडाच्या मुख्य खोडावर जमिनीपासून एक ते दीड फूट उंचीवर झाडाभोवती ३० सेमी रुंद पॉलिथिन गुंडाळून त्यावर ग्रीस लावा. असे केल्याने कीटक मातीतून झाडावर चढू शकत नाहीत. तसेच, मेलीबग किडीच्या प्रतिबंधासाठी, झाडाभोवती माती कुदळल्यानंतर, प्रति झाड २५० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर घाला. कोणत्याही परिस्थितीत हे काम डिसेंबरअखेर किंवा जानेवारीपर्यंत करा. असे केल्याने या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात कमी होतो. हे कीटक एकदा झाडावर चढले की, त्याचे व्यवस्थापन करणे फार कठीण होते.



# खा.डॉ. कल्याण काळे यांनी घेतली आयसीटी कॉलेजची आढावा बैठक

## प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात सुरु असलेल्या आयसीटी कॉलेज प्रशासनाची खा. डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार दि. २२ रोजी बैठक घेत कॉलेच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी कॉलेजच्या विविध लॅबची पाहणी करुन कॉलेजचे कामकाज समजावून घेतले. दरम्यान जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी उपाय योजना कराव्यात आणि मोसंबी प्रक्रिया करुन ज्युस जास्त काळ टिकविण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठीचे प्रोजेक्ट सादर करावेत अशा सूचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेज व्यवस्थापनाला दिल्यात. यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, आयसीटीचे डायरेक्टर शशांक म्हस्के, डेप्युटी डायरेक्टर डॉ. पराग नेमाडे, डॉ. मनोज गावडे, प्रा. गिरीश जोशी, प्रा. राहुल व्यस,कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, नंदु जांगडे, माजी जि. प. सभापती जयप्रकाश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

जालना शहरात सन २०१८ मध्ये मंजुर असलेल्या आयसीटी कॉलेजमध्ये सध्या ४५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भुवनेश्वर आणि जालना येथे एकाच वेळी आयसीटी कॉलेजला मंजुरी मिळाली होती. जालना शहरात हे कॉलेज सुरु असल्याने जालन्यासाठी आणि जालना जिल्ह्यातील जनतेसाठी कॉलेजने काही



तरी चांगले काम केले पाहिजे. जालना शहरातील प्रदूषणासाठी उद्योजकांना दोष देऊन उपयोग नाही, तर प्रदुषण नियंत्रणासाठी आयसीटीने काहीतरी उपाय केला पाहिजे. त्यासाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही. असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. बैठकी दरम्यान कॉलेजची चांगली प्रगती असून या कॉलेजचे २० विद्यार्थी हे विदेशातही फेलोशिक घेऊन उच्च शिक्षण घेत आहेत. सदरील कॉलेज हे भाड्याच्या इमारतीत सुरु आहे. परंतु, लवकरच त्यांच्या स्वतःच्या इमारतीत हे कॉलेज जाणार असून त्यासाठी शासनाने २०० एक्कर जागा उपलब्ध करुन दिली असून निधी देखील उपलब्ध करुन दिलाय. त्यामुळे इमारत लवकरच उभा करण्याचा माणस असल्याची माहिती खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिली. येणार्या काळात आयसीटी कॉलेजचा जालन्यासाठी काय उपयोग करून घेता येईल? त्यासाठी त्यांची काय मदत होते, आमची त्यांना काय मदत होते, यावर चर्चा केली असून जालन्यासाठी काहीतरी करण्यासाठी जो काही स्कोप आहे. त्यासाठी यापुढे नक्की काम करु असेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे यांनी कॉलेजच्या विविध विभागात जावून पाहणी केली व कॉलेजचे कामकाज समजावून घेतले.जालना शहरात प्रदुषणाचे प्रमाण जास्त आहे, ते कमी करण्यासाठी आयसीटी ने एक प्रोजेक्ट तयार करावा व त्यासाठी जो काही निधी लागेल तो उपलब्ध करण्याची हमी खासदार डॉ. काळे यांनी दिली आहे. हा खर्च उभा करुन जालना शहरातील प्रदुषण कमी करण्यात येईल. जमशेदपूर येथे ज्या पध्दतीने प्रदुषणावर नियंत्रण आहे, अगदी तसेच नियंत्रण जालना शहरातील प्रदुषणावर मिळविण्यात येईल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली. या प्रोजेक्टसाठी जो काही खर्च येईत तो उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटले. दरम्यान आयसीटी कॉलेजच्या व्यवस्थापनासोबत चर्चा करीत असतांना मोसंबीचे ज्यूस हे जास्त काळ टीकवता येत नाही. त्यामुळे त्याला चांगला भाव मिळत नाही. ज्यूस जास्त काळ टीकलं पाहिजे, मोसंबीवर प्रोसेसींग करुन काही तरी उपया योजना केल्या पाहिजेत. तसेच गहु काढल्यानंतर निघणारचा कचरा, उसाचे पाचट, पराट्याची झाडं शेतकरी जाळून टाकीत असतो, परंतु, त्याच्यावर देखील प्रक्रीया करुन त्याला उपयोगात आणलं गेलं पाहिजे यासाठी काहीतरी उपाय सुचविण्यात यावेत व त्याद्वारे शेतकऱ्यांना अधिकचे उत्पन्न मिळेल यासाठी संशोधन करावेअसेही खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटलंय. त्यावर आयसीटीकडे चांगले चांगले प्रोजेक्ट असल्याची माहिती कॉलेज व्यवस्थापनाने दिली.

## || थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयात सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे जयंती

पाटोदा – येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पमाल्यार्पण संपन्न झाले. व्यासपीठावर अतिथी प्राध्यापक डॉ. सय्यद शौकत, डॉ. वंदन जाधव, उपप्राचार्य डॉ. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. मनिषा गाढवे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभार डॉ. कुशाबा साळुंके यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दि.२३/०१/२०२५ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलांनी मनोगत सादर केली. सुभाष बोस यांचा जन्म ओरिसातील एका मोठ्या बंगाली कुटुंबात झाला होता. भारतीय नागरी सेवा परीक्षा देण्यासाठी त्यांना इंग्लंडला पाठवण्यात आले. परीक्षेत ते यशस्वी झाले, परंतु राष्ट्रवाद हा उच्च दर्जाचा असल्याचे कारण देत त्यांनी अंतिम परीक्षा दिली नाही. महात्मा गांधी आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीत सामील होण्यासाठी १९२१ मध्ये भारतात परत आले. त्याच्या जीवन व कार्या विषयी मुलांना माहिती देण्यात आली.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली.



# फटाके फोडणाऱ्या ३४ बुलेटवर वाहतूक पोलिसांची कारवाई

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात फटाके फोडणारे ३४ बुलेटवर कारवाई करण्यात आली सदरील कारवाई जालना शहरात वाहतूक पोलिसांनी २२ जानेवारी रोजी केली आहे. जालना शहरात विविध ठिकाणी वाहतुक शाखा जालना यांनी शहरामध्ये कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट वरती कारवाई करणे करीता मोहीम राबवली असता ५२ बुलेट ची तपासणी केली. त्यामध्ये ३४ बुलेट हया कर्णकर्कश आवाज करणाऱ्या व फॅन्सी नंबर प्लेट असलेल्या बुलेटवर मोटार वाहण कायदयाप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ईतर ८७ वाहनावर देखील कारवाई करण्यात आली. मोहीम दरम्यान ही कारवाई करण्यात आलेली असुन एकुण दंड ११३५००/- एवढा आकरण्यात आलेला आहे. तसेच एका वाहण



चालकावर दारु पिऊन वाहण चालविणे बाबत कारावाई करण्यात आलेली आहे.

पोलीस स्टेशन सदर बाजार, चंदनझिरा, कदीम जालना अतर्गत एकुण ८ बुलेटवर कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच शहर वाहतुक शाखेकडून जालना शहरातील नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणीही आपल्या ताब्यातील बुलेटला कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसवु नये, बसविले असल्यास ते तात्काळ काढून घ्यावेत ही मोहीम यापुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे.सदरील कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल, मा.अपर पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे.बी. शेवाळे, आणि वाहतुक शाखेचे पोलीस अधिकारी श्रेपोउपनि निवृत्ती शेळके, अंमलदार सतिष डिल्पे, संजय मगरे, कचरु गवते, दयानंद मोरे, पवण सुलाने, राहुल घुले यांनी पार पाडली.

# मालकीनीचा खून केल्याप्रकरणी आरोपी नोकरास जन्मठेपेची शिक्षा

जालना। प्रतिनिधी

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना यांनी आरोपी भिमराव निवृत्ती धांडे, वय ६४ वर्ष रा. नुतन वसाहत, अंबड रोड, जालना या आरोपीस मयत संगित्ता लाहोटी यांचा खून केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व पाच हजार रूपये दंडव दंड न भरल्यास एक वर्ष साचा कारावासाची शिक्षा तसेच कलम ३०९ भादवी प्रमाणे एक वर्ष कारावासाची शिक्षा व एक हजार रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधा करावासाची शिक्षा ठोठावली.



घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, यातील आरोपी भिमराव भांडे हा मयत संगिता लाहेटी यांच्याकडे घटनेच्या ४० वर्षापूर्वी पासून घरकाम करत होता. दिनांक १४/१२/२०२१ रोजी मयत संगिता लाहोटी यांचे पती अलोक लाहोटी यांनी आरोपी पास जितेन नाथानी याचा मोबाईल नंबर का येतो असे विचारले म्हणुन आरोपी याने आलोक लाहोटी यांना दगड फेकुन मारला व कॉलर पकडुन भांडण केले व नंतर पोलीस स्टेशन येथे आलोक लोहोटी हे आरोपी विरुध्द तकार देण्यासाठी गेला असता आरोपी याने आलोक लाहोटी याची माफी मागुण त्याच्या विरुध्द तकार देऊ नका अशी विनंती केली. त्यानंतर सदरील घटनेमा राग मनात धरून आरोपी भिमराव धांडे हा दि.१४/१२/२०२१ रोजी ८.४० वाजता आरोपी हा मयत यांचा पुजा बंगला येथे गेला व तेथे मयत सांगिता लाहोटी यांच्यावर घरातील किचन रूममध्ये ओट्यावर ठेवलेल्या वेगवेगळया ०४ चाकुने मयत संगितला लाहोटी यांच्या छातीवर, पोटावर, बरगडीवर, डाव्या हाताच्या मनगटावर चाकुने भोकसुन त्यांना गंभीर जखमी करून त्यांबा निर्चुण खुन केला. म्हणुन फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन सदर बाजार येथे गुन्हा क. ९३७/२०२१ कलम ३०२,४५२,३०९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता यांनी एकूण २२ साक्षीदार तपासले, त्यात फिर्यादी, पंच साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी व इतर साक्षीदार तसेच तपासिक अधिकारी श्री. प्रमोद बोंडले, पोलीस उपनिरीक्षक, स्थानिका गुन्हे शाखा, जालना यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या.मा. न्यायालयापुढे सरकारपक्षातर्फे आलेला साक्षीपुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेवून मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, श्रीमती वर्षा एम. मोडीते मॅडम यांनी आरोपी भिमराव निवृत्ती धांडे, या आरोपीस मयत संगिता लाहोटी यांचा खून केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व पाच हजार रूपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष साभा कारावासाची शिक्षा तसेच कलम ३०९ भादवी प्रमाणे एक वर्ष कारावासाची शिक्षा व एक हजार रूपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साभा करावासाची शिक्षा डोठावली प्रकरणात सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता तसेच जिल्हा सरकारी वकील तसेच फिर्यादीचे वकील यांनी काम पाहिले. सदर प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना, श्री. सुभाष भुजंग, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होता.

# पं. यादवराज फड यांची अध्यक्षपदी निवड

बीड। प्रतिनिधी

संगीतोन्मेश संस्था, पुणे आणि श्री.वै. वा. ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज बाळनाथ बाबा संस्थान श्री.क्षेत्र चाकरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविशरात्री महोत्सवा निमित्ताने दिनांक २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान १७ वे अखील भारतीय वारकरी संगीत संमेलन श्री. क्षेत्र चाकरवाडी येथे आयोजित करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी वारकरी संगीत परंपरेचे अभ्यासक प्रख्यात गायक आणि प्रतिभावंत संगीतकार पं. यादवराज फड यांची एक मताने निवड करण्यात आली. तसेच स्वागताध्यक्ष पदी संस्थानाधिपती श्री. महादेव महाराज (तात्या) यांची तर कार्याध्यक्ष म्हणून सुनिल मिसाळ यांची निवड करण्यात आली आहे. चाकरवाडी येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्याध्यक्ष सुनिल मिसाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. पं. यादवराज फड हे बीड जिल्ह्याचे सुपुत्र असुन त्यांच्या संगीत साधनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधुन या संमेलनाचे विशेष आयोजन या वर्षी श्री.क्षेत्र चाकरवाडी येथे केले आहे. त्यांची ''सेऊ ब्रम्हरस आवडीने'' व ''वारकरी संगीत परंपरेतील नऊ रत्ने'' हि वारकारी संगीत परंपरेवर दोन पुस्तके प्रकाशीत आहेत. या संमेलनाच्या उपक्रमाद्वारे आतापर्यंत जवळपास ५०० हुन अधिक कलाकारांना संधी मिळवून दिली आहे. त्यांचे हे परंपरेसाठी अतुलनीय योगदान लक्षात घेऊन त्यांची संमेलनाच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. कानपूर, हरिद्वार, पुणे आणि मराठवाड्यातील गायक, वादक आणि किर्तनकार या तीन दिवसीय संगीत संमेलनात सहभागी होणार आहेत.

# तेथे उजेड आहे कधीचा, येथे अजून अंधार आहे तेथे जलाशय भरलेला, येथे तहान फार आहे –डॉ.काळे

पाटोदा। प्रतिनिधी

तेथे उजेड आहे कधीचा, येथे अजून अंधार आहे! तेथे जलाशय भरलेला, येथे तहान फार आहे' अशा एकापेक्षा एक सरस कवितांचे सादरीकरण करून प्रसिध्द कवी डॉ. नपु काळे यांनी कवितेची मैफल रंगतदार केली. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त आयोजित काव्य मैफलीचे प्रमुख पाहुणे म्हणून ते आपल्या कवितांचे सादरीकरण करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते.

पुढे त्यांनी तेथे बहरलेल्या बागा कधीच्या, येथे अजून दुष्काळ आहे अशा शब्दामध्ये मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. 'कसायाचे सारेच नाते हे एक भ्रम असतात प्रसंगी ते हलाल करतात.

जपून द्या हातात हात आपला, हल्ली विषारी साप वळचणीला भरपूर असतात' अशा शब्दात बदलत्या माणसाच्या स्वभावाचे चित्र श्रोत्यांसमोर उभे केले. महाविद्यालयीन युवकांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांनी शहीद भगतसिंगांची आठवण सांगणारी 'भगतसिंग...तू ग्रेटच, प्रेयसीवर प्रेम करण्याच्या वयात...तू देशावर प्रेम केलेस' ही कविता सदर करून सर्व उपस्थित युवकांची मने जिंकली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी कवितेचे महत्व विषद करताना म्हटले की एक क्रांतिकारी कवी आपल्या कवितेच्या माध्यमातून समाजाला दिशा देऊ शकतो. जसे १६ व्या शतकामध्ये संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंग लेखनाच्या माध्यमातून करून दाखविले आहे. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कृष्णा नागरे आणि स्पर्धेचे परीक्षण डॉ. जालिंदर लोणके यांनी केले. या काव्यवाचन स्पर्धेमध्ये वैभव सस्ते, रोहित नागरगोजे, गीतांजली भालेकर, गायत्री दळवी, सुनीता पवार, पल्लवी गिरी या विद्यार्थ्यांबरोबरच प्रा कुशाबा साळुंके, प्रा अजिंक्य साखरे, प्रा प्रदीप मांजरे, प्रा. कुलदीप सानप व महाविद्यालयातील इतर बहुसंख्य प्राध्यापक, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

# २४ रोजी शहर स्वच्छतेसाठी निवेदन देणार रहा -देशपांडे

बीड। प्रतिनिधी

शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रूपाली देशपांडे यांनी बीड शहर स्वच्छतेकरिता बीड नगर परिषद प्रशासनासह जिल्हा प्रशासनाला भेटून निवेदन देण्याचे ठरविले आहे. याकरिता शहर स्वच्छतेसाठी तळमळ असणाऱ्या समविचारी नागरिकांनी दिनांक २४ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी दुपारी ०१:०० वा. बीड नगर परिषद येथे एकत्र यावे तिथे मुख्याधिकारी यांना निवेदन दिल्यानंतर सर्वांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात येणार आहे. तरी सर्वांनी निवेदन द्यायला यावे असे आवाहन करण्यात आले आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहर स्वच्छतेसाठी सर्व संघटना, विविध सामाजिक संस्था आणि शहरातील महिला/पुरुषांनी एकत्र यावे.



काही दिवसांपूर्वी बीड शहर स्वच्छेतेसाठी मुख्याधिकारी नीता अंधारे यांना भेटण्यासाठी गेल्यावर त्या काही भेटल्या नाहीत. म्हणून आता दिनांक २४ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी दुपारी ०१:००, वा परत एकदा निवेदन दिले जाणार आहे. बीड शहरातील प्रत्येक कॉलनीत, प्रत्येक गल्लीत एक कचरा कुंडी पाहिजे. विद्युत खांबावर लाईट ची व्यवस्था पाहिजे. बीड शहराला चार दिवसाआड नळांना पाणी सोडायला हवे. इत्यादी मागण्याचे निवेदन देणार आहे. म्हणून सर्वांना विनंती आहे की, शहर स्वच्छतेसाठी या कामात साथ द्या. एक तिच्या बाळाला नक्कीच चांगले फळ मिळते. बीड शहराच्या स्वच्छते करिता आपण सर्वजण मिळून करूया. म्हणून महिला, पुरूषांसह सर्व सामाजिक संघटना एकत्र आल्यास चांगले कामे होईल आहे.


**जाहीर प्रगटन**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com ०२४८३-२७१७८७

**जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी–१२५**

**दिनांक: २२/०१/२०२५**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. शेषराव दत्ताराव गरड २. मंगलाबाई शेषराव गरड रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे भारती शिवाजी रनमळे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २८९० दि. १०/१२/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १४७ दिनांक:– १६/०१/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला भारती शिवाजी रनमळे रा. ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (–) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं ८१४ मधील एकुण क्षेत्र १२३.१४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

**पुर्व :– शेख सिराजभाई यांची जागा,**

**पश्चिम :– अनिस यांची जागा, दक्षिण :– रस्ता**

**उत्तरेस :– देशमुख यांची जागा**

या वरील चतु:सिमा मधील १२३.१४ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**

नगरपंचायत घनसांवगी


# संत हे ज्याच्या चित्ताचा विषय देव झाला अशाची संगती मागतात– मोहन महाराज खरमाटे

बीड । प्रतिनिधी

मानवी जीवनात दु:खात्मक बद्धता जाण्यासाठी चांगली संगती आवश्यक आहे. कुसंगती केल्यास जीवन वाईटच बनेल. सत्संगती केल्याने जीवन सार्थकी लागते. संत जीवनात भगवंताचे अखंड नामस्मरण असते, त्यांचा विषय देव झालेला असून जीवन सार्थक झालेले असते. म्हणूनच संत हे ज्यांच्या चित्ताचा विषय देव झाला आहे अशाची संगती मागतात असे प्रतिपादन ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे खोकरमोहकर यांनी संत वामनभाऊ, संत भगवान बाबा, संत तुकाराम महाराज मंदिर इंद्रप्रस्थ कॉलनी येथे आयोजित किर्तन सेवेमध्ये सांगितले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप याच्या नियोजनातुन गेल्या १३



वर्षापासुनश्रीसंत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते या निमित्त यावर्षी वैराग्यमुर्ती वे.श्री संत वामन भाऊ श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कीर्तनात निरुपसाठी देव वसे चित्ती/ त्याची घडावी संगती //१// या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांनी संत संगतीचे फायदे सांगितले.आपल्या अभंग निरूपणातून बोलताना मोहन महाराज खरमाटे म्हणाले की,श्रीसंत वामनभाऊ महाराज हे श्रीसंत बंकट स्वामी महाराज निनूरकर यांचे पटशिष्य होते. ते आपल्या कीर्तनातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध आपल्या गायनातून व ज्ञान दानातून करत होते. वैराग्याचे ते मूर्तीमंत महामेरू म्हणून ख्यातनाम होते. जीवन महात्म्यांचे सर्व गुण त्यांच्यात दिसून येत असत.

पुढे बोलताना खरमाटे महाराज म्हणाले की ,मनुष्य देहाला आल्यानंतर ते जीवन सार्थकी लागण्यासाठी, जीवनात परिवर्तन होण्यासाठी,संत सहवास आवश्यक आहे.जीवनात आपण जर अधमाची संगती केली तर आपले जीवन वाईट बनेल व संतांची संगती केली तर त्यांच्या सहवासातील ज्ञानाने आपले जीवनही चांगले होईल म्हणूनच संत हे ज्यांच्या चित्तामध्ये देव आहे अशा संतांची संगती मागतात असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी महाराजांचे स्वागत प्रतिष्ठानचेअध्यक्ष डॉ राजेंद्र सानप यांनी केले यावेळी बाबुराव म मुंडे,इंद्रजित म भंडारे,अंगद म मोरे,दिंगाबर म कुंडलकर,किशन म माने,श्रीहर्ष म धांडे,वैभव म येडे,विजय म वीर,या टाळकऱ्यासह मृदंगाचार्य अक्षय म घोलप,विणेकरी वाल्मिकी चाटे,पेटीवर केशव.म बडे यांच्यासह ह भ प रामहरी रसाळ गुरुजी,आर के भोंडवे,राजेंद्र घोलप,आश्रुबा नागरगोजे,एम डी पांचाळ,गोरक्षनाथ मिसाळ,धनंजय सानप,श्रीमती सुमित्राताई खेडकर दत्तात्रय म. दै.चंपावतीपत्र चे पत्रकार महादेव साळुंके यांच्या सह असंख्य भाविक–भक्त उपस्थित होते. किर्तना नंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले.

cmyk

राज्य लोकतंत्र



# छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्काराने गौरव

## शरद पवार,उपमुख्यमंत्री अजित पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

**वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे मार्फत दिला जाणारा २०२३-२४ यावर्षीचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर पूर्व विभाग )द्वितीय पारितोषिक छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड यांना मा.शरदचंद्रजी पवार व मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला.**



हा पुरस्कार कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप व कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी, सचिव, चीफ इंजिनिअर, चीफ अकाऊंटंट यांनी स्वीकारला.

काल पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांच्यावतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मागील २०२३-२४ या वर्षाच्या तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षमता मधील उसाचा तंतुमय निर्देशांक ८४.१०%, रिड्यूस्ड मिल एक्सट्रॅक्शन ९५.६५ , प्रायमरी एक्स्ट्रक्शन ७३.३०%, बगॅस बचत ११.५१%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर ४०.६०%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या विजेचा वापर २६.४० किलो वॅट प्रति टन ऊस, गाळप क्षमतेचा वापर ११२.४७%, देखभाल दुरुस्तीसाठी एकूण खर्च रुपये ११५ प्रति टन ऊस, गाळपाचे बंद कालावधीचे प्रमाण १.०७% बगॅस मधून व्येय होणाऱ्या साखरेचे प्रमाण ०.५६% मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या मध्ये घट ०.४८१% असे कार्यक्षमता वैशिष्ट्य कारखान्याने केलेली असून यामुळे छत्रपती कारखान्यास मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन कारखान्यास गौरविण्यात आले या पुरस्कारासाठी सर्व स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप, व्हा.चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे. स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप,व्हा.चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्क प्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांना अभिवादन केले.बीड जिल्हा रुग्णालय येथे सर्व रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप,प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजना खाली आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना अल्पउपहार देण्यात आला.युवासेना माजलगाव तालुका युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजना खाली माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.धारूर तालुकाप्रमुख

◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रॅलीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाव्दारे निर्देशित पंधरावा राष्ट्रीय मतदार दिन दि. २५ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करणसाठी दि. २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय मतदार दिनाचा मुख्य कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी बीड यांनी कळविले आहे.

# वडवणीत रंगणार वडवणी कीर्तन तपपूर्ती महोत्सव

## ज्ञानेश्वरी प्रवक्ते अर्जुन महाराज खाडे यांची माहिति

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील नामांकित ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणी शहरात प्रारंभ केलेल्या किर्तन महोत्सवाचे यंदाचे हे बारावे वर्ष असून यानिमित्त भव्य असा वडवणी कीर्तन तपपूर्ती महोत्सवाचे आयोजन वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे स्व.गोपीनाथराव मुंडे चौक या ठिकाणी करण्यात आलेले आहे. याचा प्रारंभ दिनांक २५ जानेवारी २०२५ शनिवार रोजी होणार असून दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी याची सांगता होणार आहे. तरी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



आपल्या मधुर वाणीतून संपूर्ण महाराष्ट्रभर ज्ञानेश्वरीचे कथा प्रवचन करणारे नामांकित प्रवक्ते ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणी शहरात सुरु केलेल्या किर्तन महोत्सवाचे यावर्षीचे हे बारावे वर्ष असून एक तपाची पूर्ती यंदा होत असून यानिमित्त या वडवणी कीर्तन तपपूर्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याचा प्रारंभ दिनांक २५ जानेवारी २०२५ शनिवार रोजी होणार असून दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी याची सांगता होणार आहे. या कीर्तन महोत्सवामध्ये दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते ११ सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, व रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन सेवा अशा स्वरुपाचा असणार आहे. या कीर्तन महोत्सवात

◀◀ पान ३ वर

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख करणार पुष्पवृष्टी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

प्रजासत्ताक दिनाच्या राजधानीतील कर्तव्यपथावरील मुख्य सोहळयात महाराष्ट्राची कन्या फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजारोहणानंतर ध्वजावर पुष्पवृष्टी करणारआहे.



बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यामधील देवडी गावची दामिनी दिलीप देशमुख वायुदलात फ्लाईंग ऑफिसर म्हणुन कार्यरत असून राजधानी दिल्लीतील कर्तव्य पथावर होणाऱ्या मुख्य सोहळयात 'परेड कमांडर' म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे.दामिनीचे वडील न्यायधीश दिलीप देशमुख हे पुणे विभागाचे माजी धर्मादाय आयुक्त कमिशनर असून त्यांचा कुटुंबियांचा सामाजिक आणि शैक्षणिक वारसा दामिनीने आपल्या मेहनतीने पुढे नेला आहे. वर्ष २०१९ मध्ये देशपातळीवरील कॉमन ऍडमिनिस्ट्रेटिव्ह


◀◀ पान ३ वर

# फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र म्हणणाऱ्या दिलीप मंडल हकलपट्टी करा - सज्जाद सय्यद

**पाटोदा । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षण देण्याचे काम त्यांचे सहकारी म्हणून शिक्षिका फातिमा शेख यांनी केले. तसेच उस्मान शेख यांनी०१ मे १८४९ रोजी पुणे येथे प्रौढ शिक्षणनाची स्थापना केली होती. त्यामध्ये सुद्धा माता सावित्रीबाई फुले यांनी अध्यापन कार्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या मैत्रिण व सहकारी शिक्षिका फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अनुपस्थितीमध्ये शाळा सांभाळण्याचं काम केलं. उस्मान शेख व महात्मा फुले यांचे विचाराची मैत्री होती. आणि उस्मान शेख यांची बहीण शिक्षिका फातिमा शेख मुस्लिम समाजातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. त्यांच्या अनेक ग्रंथात माता सावित्रीबाई फुले व माता फातिमा शेख व शाळेतील मुली सह अनेक दुर्मिळ फोटो आजही उपलब्ध आहेत. अनेक ग्रंथात त्यांचा उल्लेख आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीवर केंद्रीय माहिती प्रसारण सल्लागार दिलीप मंडल यांनी हे काल्पनिक पात्र आहे. असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुस्लिम, बहुजन समाजासह सत्यशोधक चळवळीला गालबोट लागत आहे. शिव-शाहु-फुले -आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये हे विधान खपवून घेतले जाणार नाही. या वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध करून दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक - सज्जाद सय्यद, मानवाधिकारचे शेख इम्रान नूर मा. उपविभागीय अधिकारी यांच्या कडे निवेदन द्वारे करण्यात आली आहे.





# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये महापुरुषांना अभिवादन

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये आज दि. २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# घाटनांदुर गणातून भाजप सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद - प्रदीप वैद्य

घाटनांदुर । प्रतिनिधी

देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष भाजप असून भाजपचे नेतृत्वात अनेक ऐतिहासिक बदल घडवून आले आहेत. विकास, पारदर्शकता, राष्ट्रप्रेम व सर्वसमावेशकता हे या पक्षाचे मुख्य आधारस्तंभ असून नागरिकांनी या राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे सभासद होणे हे महत्त्वाची पावली आहेत.



भारतीय जनता पार्टी ही केवळ एक राजकीय संघटना नसून ती एक विचारधारा आहे देशाच्या सांस्कृतिक सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी समर्पित या पक्षाने नेहमीच सामान्य नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य दिले आहे सबका साथ,सबका विकास, सबका विश्वास या तत्त्वावर

◀◀ पान ३ वर

# भ्रष्ट कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या पत्राला केराची टोपली ?

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव पंचायत समिती मधील घरकुल योजनेमध्ये हप्ते टाकण्यासाठी येथील गटविकास अधिकारी घरकुल विभागात गृहनिर्माण अभियंता विस्तार अधिकारी तसेच संगणक परिचालक हे स्वतःच्या फायद्यासाठी चिरीमिरी देणाऱ्यांचीच कामे करत आहेत तसेच घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास हप्ते पडत नाहीत घरकुलधारकांना घरकुल बांधणीसाठी सर्वसाधारणपणे दीड लाख रुपयाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता विस्तार अधिकारी संगणक परिचालक हे लक्ष्मी दर्शनाची मागणी करतात त्यामुळे दीड लाख रुपये रकमेतून या सर्वांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात. त्यामुळे घरकुलधारकास घर कसे बांधावे हा प्रश्न निर्माण होतो याच नैराश्यातून घर बांधण्याची त्यांची इच्छा होत नाही लाभ देत असताना अभियंताकडून गरजू व पात्र लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार होत असल्याने ऑपरेटर मगरीची हुकूमशाही वाढत असल्याने लाभार्थ्याकडून पैसे घेतल्याशिवाय हप्ते काढले जात नाहीत गेल्या १५ वर्षापासून ते एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने त्यांची हिम्मत वाढली आहे गट विकास अधिकारी माजलगाव हे मगरेच्या क*** कारणाम यांना पाठीशी घालतात त्यामुळे त्याची हिंमत वाढत चालली आहे कोणी काही बोलले तर ते खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतात अशा आशयाची तक्रार निवेदन दि. ६/१/२५ रोजी देण्यात आले होते यामध्ये संबंधितांची चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी तक्रारदारांकडून करण्यात आली होती संबंधिताची चौकशी करून बडतर्फ न केल्यास दि. २३/१/२५ रोजी आमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता त्याच अनुषंगाने प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांना लेखी पत्र काढत घरकुल विभागात कार्यरत

◀◀ पान ३ वर

# गुन्हेगारी अनुषंगाने अंभोरा पोलीस ठाणे सतर्क

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांना सुचीत करण्यात येते की, बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावंत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळासाहेब हानपुडे पाटील साहेब आष्टी यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याची प्रतिमा राज्यातच नव्हे तर देशात चांगली बनावी यासाठी विविध उपक्रम राबवित होतो. त्याचाच एक भाग म्हणून बीड पोलिसांमार्फत नागरिकांना लवकरात लवकर चांगली सेवा देऊन त्यांचे जीवन सुरक्षित करण्याचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून अंभोरा पोलीस दल जास्तीत जास्त लोकांभिमुख करण्यासाठी मी अंभोरा पोलीस स्टेशनच्या वतीने आपणाला आवाहन करतो की,आपण अंभोरा पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी आले असता तेथे आपल्या तक्रारीची तात्काळ दखल घेतली जात नसेल अथवा तक्रारीच्या अनुषंगाने आपल्याकडे कोणत्याही स्वरूपात लाच मागितली असेल तर तात्काळ माझे कार्यालयात येऊन माझेशी संपर्क करावा अथवा माझे मोबाईल क्रमांकावर आपल्या तक्रारीच्या अनुषंगाने मेसेज करावा.




तसेच अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत कोठेही कोणताही अवैध्य धंदा चालत असेल तर त्याबाबत तात्काळ माझेशी संपर्क साधून मला माहिती कळवावी. अवैध्य धंद्याचे हद्दीतून समूळ उच्चाटन करण्यासाठी आपल्या सहकार्याची खुप गरज आहे. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य केल्यास आपण निश्चितच आपल्या हद्दीतील सर्व अवैध्य धंदे पूर्णतः बंद करू शकतो. माहिती देणाराचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

# एकतिसाव्या वर्षी परंपरा राखत श्री साई पायी पालखी सोहळा शिर्डीकडे मार्गस्थ

## अंबानगरीत पालखीचे जल्लोषात स्वागत; साईनामाने अंबानगरी दुमदूमली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**तालुक्यातील अंबासाखर कारखाना येथील श्री साई मंदीरातून पायी पालखी सोहळा सोमवार २२ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हाती भगव्या पतका असलेल्या शेकडो साई भक्तासह ढोलताश्याच्या गजरात, साईनामाच्या जयघोषात फटाक्याची अतिषबाजी करत शेकडो साईभक्तसह श्री साई पायी पालखी सोहळ शिर्डीच्या दिशेने अंबाजोगाई मार्गे चनई धारूर मुक्कामी मार्गस्थ झाला आहे. पालखी सोहळ्यात जिल्यातून शेकडो साईभक्त सहभागी झाले आहेत.**





तालुक्यातील अंबासाखर कारखाना येथील साई मंदीरातून शिर्डीकडे जनारा श्री साई पायी पालखी सोहळ्यास मराठवाड्यातील मानाची पहिली पालखी म्हणून ओळखला जातो. पालखी अध्यक्ष गोकुळ महाराज वैष्णव यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी २२ जानेवारी रोजी शिर्डीकडे मार्गस्थ होत आसतो. पालखी सोहळा गेली ३० वर्षा पासुन सुरू आसुन यंदाचे हे वे३१ वर्ष आहे. हा सोहळा प्रतिवर्षाप्रमाने याही वर्षी २२ जानेवारी बुधवार रोजी सकाळी १० वाजता ढोल ताश्या, लेझीम, टाळ मृदंगाच्या गजरात, फटाक्याची अतिषबाजी करत साईनामाच्या घोषात हभप गोडबोले महराज जोगाईवाडीकर यांच्या हस्ते प्रस्थानकरुन शेकडो साईभक्तासह मार्गस्थ झाला आहे. पालखी सोहळा मार्गस्थ होण्यापुर्वी प्रथम पालखी अध्यक्ष हभप गोकुळ महाराज वैष्णव व कुटूंबीयांच्या हस्ते श्री पारायण, श्री साई पादुका मंगलस्नान, पुजापाट, काकडा आरती, तिर्थ प्रसादाचे वाटप करण्यात आले.ढोल ताश्या, लेझीम, टाळ मृदंगाच्या गजरात, फटाक्याची अतिषबाजी करत साईनामाच्या घोषातहा सोहळा दुपारी अंबानगरीत शेकडो साईभक्तासह दाखल झाला. या वेळी शहरात पालखी मार्गावर ठिकठीकाणी रांगोळी काढुन रस्ते शुशोभिकरण करण्यात आले होते. सोहळ्यातील साईभक्तांचे शहरात जल्लोषात स्वागत करून अल्पोहार, चहापाण्याची तर मंगळवार पेठेतील साई मंदीराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. साईनमाच्या जयघोषाने अंबानगरी भक्तीमय झाली होती. श्री योगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन हा सोहळा सायंकाळी

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# कात्रीने पत्नीचा गळा कापला, मुलाला समोर खुर्चीत बसवले अन् लाईव्ह व्हीडीओत दिली कबुली

**पुणे । प्रतिनिधी**

बुधवारी पहाटे पत्नीचा खून करून पोलिसांत हजर झालेल्या अरोपीला पोलिसांनी अटक केली. त्याची बातमीही प्रसिध्द झली; मात्र नेटकरी तेंव्हा हदरले जेंव्हा या नराधमाने पत्नीच्या मृतदेहाशेजारी उभे राहून आणि शेजारी मुलाला खुर्चित बसवून लाईव्ह व्हीडीओ केला आणि त्यात पत्नीच्या खुनाची कबुली दिली. गुरुवरी दिवसभर हा व्हीडीओ व्हायरल झाला आणि एकच खळबळ उडाली.



कौटुंबिक वादातून शिवदास तुकाराम गिते (३७) याने पत्नी ज्योती शिवदास गिते हिचा कात्रीने गळा कापून खून केला. पत्नीचा खून केल्यानंतर शिवदासने समाजमाध्यमावर लाईव्ह येत पत्नीचा खून का केला, हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये तो ज्योतीला त्याने का मारले हे सांगत आहे. दरम्यान हा सर्व प्रकार सुरू असताना त्यांचा पाच वर्षाचा मुलगा खोलीतच खुर्चीवर बसून होता. त्यानंतर शिवदास स्वतः मुलासह खराडी पोलिस ठाण्यात हजर झाला आणि माझी पत्नी ज्योती सतत माझ्यासोबत वाद घालत असल्यामुळे मी तिला राहत्या घरी मारून टाकले आहे, असे पोलिसांना सांगितले. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी ज्योती रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. पोलिसांनी शिवदासला तातडीने ताब्यात घेतले. याप्रकरणी, ज्योती यांची बहीण सविता हरिभाऊ नागरगोजे (३७, रा. लोणीकाळभोर, मुळ.पाथर्डी,जि. अहिल्यानगर) यांनी खराडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानुसार पोलिसांनी शिवदास विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवदास शिवाजीनगर कोर्टात करारावर स्टेनोग्राफर म्हणून काम करत होता. तो स्टेनोची डव्हांन्स परिक्षा नापास झाला होता. त्या विरुध्द तो उच्च न्यायालयात गेला होता. न्यायालयाने त्याला काही महिन्यांची मुदत दिली होती. यामुळे पत्नी सातत्याने त्याच्या मागे अभ्यास कर, असा तगादा लावत होती. यामुळे रागाच्या भरात खून केल्याची प्राथमिक कबुली त्याने दिली आहे. आरोपी मुळचा बीडचा आणि मृत पत्नी अहिल्यानगरची आहे.

# प्रखर आणि जाज्वल्य स्वराज्य रक्षक सोहळ्यास मला संधी, हा परमोच्च आनंद-दिगवीजय जेधे

**दौंड । प्रतिनिधी**

गडांचा राजा आणि राजांचा गड रायगडावर आयोजीत प्रखर राष्ट्रनिषठा आणि जाज्वल्य स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे राज्य भिषेक सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळाली. हा माझ्या पुर्व ज्यांची पुण्याई आणि माझ्या जीवनातील परमोच्च आनंदाचा क्षण आहे. असे प्रांजळ मत देशभक्त केशवराव जेधे घराण्याचे

वंशज दिगवीजय जेधे यांनी व्यक्त केले आहे.

याबाबत आमच्या प्रतिनीधी शी सविस्तर बोलताना जेधे पुढे म्हणाले, गडांचा राजा आणि राजांचा गड रायगडावर प्रखर राष्ट्रनिषठा आणि जाज्वल्य स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे भोसले यांचा राज्य भिषेक सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मला निमंत्रीत करण्यात आले होते. हा राज्य अभिषेक सोहळा अतिशय उत्साहाने आणि जोरदारपणे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास स्वराज्याचे शिलेदार असलेले आणि स्वातंत्र्य संग्रामात अग्रभागी असलेले देशभक्त केशवराव जेधे घराण्याचे वंशज दिगवीजय जेधे, क्रांती सुर्य . शाहिद एक आलम



भगतसिंह यांचे वंशज भाऊ रंगारी , क्रांतिकारक नागनाथ आण्णा नायकवडी, नाना पाटील यांचे वंशज , गोवा मुक्ती संग्रामातील सज्जन राव पाटील, विवीध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, मान्यवर आणि हजारो शभु भक्त या सोहळ्यास उपस्थित होते. या सोहळया पूर्वी जी मानाची पालखी निघते तिचे पूजन जेधे यांनी केले.या पालखितून शंभु राजे यांची मुर्ती जगदिशवर मंदिराकडे नेण्याचा मान जेधे यांना मिळाला. या राज्य अभिषेक सोहळयास हिंदुस्थान चया स्वातंत्र्यासाठी ज्या ज्या कांती कारक देशभक्तांनी प्राणांची आहुती दिली.या क्रांतीकारकांना घ्या परिवारातील सदस्य यांचे हस्ते शंभु राजांच्या राज्य अभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.

छत्रपती संभाजी महाराज राज्य अभिषेक सोहळा समिती हा राज्य अभिषेक सोहळा गेल्या १२ वर्षापासुन साजरा करीत आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण मिळते. या पेक्षा जीवनातील भाग्य ते कोणते. असे अतिशय विनम्रपणे जेधे यांनी नमुद केले आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचा मान जेधे यांना मिळाला, ही दौंडकर यांचे साठी अभिमानाची बाब असून जेधे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नारायणगाव स्थानकासमोर वाहने लावल्यास कारवाई

**नारायणगाव । प्रतिनिधी**

नारायणगाव बसस्थानकासमोरील हॉटेलच्या बाहेर वाहने लावली जात असल्याने अपघाताची भीती व्यक्त होत आहे. पोलिसांनी यावर उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.



नाशिक महामार्गावर मुक्ताई धाब्याजवळ रस्त्याच्या कडेला बंद पडलेल्या एसटी बसवर प्रवासी वाहतूक करणारे वाहन व टेम्पो आदळल्याने भीषण अपघात होऊन नऊ जणांचा बळी गेला. त्यामुळे पोलिस अलर्ट मोडवर आहेत. रस्त्याच्या कडेला वाहतुकीला अडथळा होणार नाही, याबाबत दक्षता घेतली जात आहे. नारायणगाव बसस्थानकासमोर असलेल्या हॉटेलच्या पुढे रस्त्याला खेटून वाहने उभी केली जातात. त्यातच बसस्थानकाचे काम चालू आहे. बस आत येण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी एकच मार्ग असल्याने या ठिकाणी अपघाताची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने रस्त्याच्या कडेला कोणीही वाहने लावू नयेत, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे. या ठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आली आहेत. बॅरिकेड्सच्या बाहेर वाहन लावणाऱ्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिला आहे. शेलार म्हणाले की, बसस्थानकाच्या समोर दुचाकी वाहने मोठ्या संख्येने लावली जातात. पोलिस वारंवार सांगून देखील कोणी दखल घेत नाही. यापुढे रस्त्यावर जर कोणी वाहन लावले आणि वाहतुकीला अडथळा होत असल्याचे निदर्शनास आले, तर त्या वाहनावर दंडात्मक कारवाई करून वाहन जप्त केले जाईल. नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे म्हणाले की, मुक्ताई मंगल कार्यालयाच्या समोर मोकळी जागा असून, त्या ठिकाणी वाहनतळ केले जाईल. नारायणगाव शहरामध्ये येणाऱ्यांनी वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने बसस्थानकासमोर वाहने लावू नयेत.

# व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या अध्यक्षपदी संदीप पांचाळ



**पुणे । प्रतिनिधी**


पुणे येथे पार पडलेल्या पत्रकार संघटनेच्या बैठकीमध्ये संदीप पांचाळ यांची व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या डिजिटल मीडिया विंग पुणे पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

पत्रकाराच्या क्षेत्रांमध्ये निर्भीडपणे केलेले काम व अनुभव पाहता यांची पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल मीडिया विंगचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ,प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, कार्याध्यक्ष अशोक घावटे ,पुणे जिल्हाध्यक्ष अमिन गोरे , उपाध्यक्ष अश्विनी पुरी , यांच्या हस्ते सदर निवडीचे पत्र देण्यात आले . पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी एकत्र येऊन संघटनेची बांधणी करणार, लढा उभारणार असल्याचे व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल मीडिया विनचे नवनिर्वाचित अध्यक्ष संदीप पांचाळ यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये कामगारांच्या झोपड्यांना आग, पाच लाखांची रोकड जळून खाक

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात बिगारी कामगारांच्या घराला आग लागून भीषण दुर्घटना घडलीय. पत्रा शेडच्या झोपडपट्टीत आज सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास ही आग लागली होती. पिंपळे गुरव परिसरात काशीद पार्कजवळ ही झोपडपट्टी आहे. या आगीच्या घटनेत कामगारांच्या घरात लाखोंची रोकड जळून खाक झाली. याशिवाय सोन्याचे दागिनेही जळून राख झाले. आगीच्या या घटनेनंतर कामगारांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, बिगारी कामगारांच्या घराला लागलेल्या आगीत लाखोंची रोकड जळालीय. सकाळी साडे अकरा वाजता ही आगीची घटना घडली. कामगारांच्या घरात रोकड ठेवली होती ती जळून खाक झाली. याचे फोटो आणि व्हिडीओ आता समोर आले आहेत. झोपडपट्टीला लागलेली आग आटोक्यात आणण्यात अग्नीशमन दलाला यश आलंय. मात्र आगीचं कारण स्पष्ट होऊ शकलेलं नाही. पिंपरी चिंचवडच्या लेबर कॅम्पमध्ये लागलेल्या आगीच्या या घटनेत पाच लाख सत्तर हजार रुपयांची रोकड जळून खाक झालीय. तर साडे चार तोळे सोन्याचे दागिनेही जळून राख झाल्याची माहिती समोर आली. आग लागलेल्या ज्या झोपडीत ही रोकड आणि सोन्याचे दागिने होते ती मुकादम असलेल्या करिअप्पा गुंडापूर याची होती. सेंट्रिंगच्या ठेकेदारांना ती दिली होती अशी माहिती समजते. बाणेरचे विठ्ठल पन्हाळे आणि हिंजवडीचे गजानन गदाडे अशी त्यांची नावे आहेत. या दोन ठेकेदारांकडे इतकी रक्कम कुठून आली याचा तपास पोलीस करत आहेत.

# रिक्षाचालकांच्या भांडणात एकाचा मृत्यू

कोरेगाव भीमा : कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथे किरकोळ कारणावरून रिक्षा चालकांमध्ये झालेल्या शाब्दिक वादातून तिघांनी दगडाने बेदम मारहाण केल्याने एका रिक्षाचालकाचा मृत्यू झाला. मारहाण करून फरार झालेल्या आरोपींना शिक्रापूर पोलिसांनी तातडीने शोध घेत रिक्षासह ताब्यात घेतले.

रिक्षाचालक राजेंद्र मुंगसे (वय ५८, रा. आनाजीचा मळा, वढू बुद्रुक, ता. शिरूर) यांचा मंगळवारी (ता. २१) रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने शिक्रापूर पोलिसांनी याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून सोमेश सरोदे (वय २७, रा. मोरे वस्ती, चिखली, पिंपरी चिंचवड, मूळ रा. रेल्वे स्टेशन जवळ, सांगली), दीपक साठे (वय १९, रा. नेहरूनगर, पिंपरी), ज्ञानेश्वर दुकळे (वय १९, रा. मोरे वस्ती, चिखली, पिंपरी चिंचवड; मूळ रा. सौंधे, ता. करमाळा जि. सोलापूर) यांना अटक केली आहे.

कोरेगाव भीमा येथे रिक्षाचे (क्र. एम.एच. १२ क्यू.आर. ५२४२) चालक राजेंद्र मुंगसे हे रविवारी (ता. १९) सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या रिक्षातून जात असताना एका रिक्षा चालकाशी त्यांचा शाब्दिक वाद झाला. त्यानंतर मुंगसे पुण्याच्या दिशेने जात असताना पाठीमागून आलेल्या रिक्षा चालक व रिक्षामधील दोघांनी राजेंद्र यांना लाथाबुक्क्यांनी, तसेच दगडाने तोंडावर व डोक्याला बेदम मारहाण करून पळून गेले.

याबाबत अनिल राजेंद्र मुंगसे (वय ३०, रा. आनाजीचा मळा, वढू बुद्रुक) यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी तिघाविरोधात गुन्हा दाखल केला. तक्रारीच्या अनुषंगाने शिक्रापूरचे पोलिस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून संबंधित रिक्षाचा शोध घेतला असता एम.एच. १४ एल.एस. ०९१५ या क्रमांकाच्या रिक्षातील तिघांची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप साळुंखे, पोलिस उपनिरीक्षक विजय मस्कर, यांच्या पथकाने पुण्यातील कुदळवाडी परिसरात जाऊन तिघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्यांनी रिक्षाच्या वादातून झालेल्या शाब्दिक वादातून सदर गुन्हा केल्याचे सांगितले.

# कॉलर टाईट करा, पीर-बीर बाबांना विचारू नका, नितेश राणेंचं वादग्रस्त वक्तव्य, सैफ अली खानच्या हल्ल्यावरही

पुणे । प्रतिनिधी

या सरकारमध्ये आपली कॉलर टाईट करा. पीर-बीर बाबांना विचारू नका. मोहम्मद पैगंबर यांना मानणारे मुस्लीमच पीर-बाबा वगेरे मोजत नाही. मैं इस बाप का हू की उस बाप का यातच यांचा गोंधळ सुरू असल्याचे वादग्रस्त वक्तव्य भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी केले आहे. नितेश राणे यांच्या वक्तव्यानंतर वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अयोध्या येथील राम मंदिर उभारणीच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित आळंदी आणि निगडी येथील कार्यक्रमांना बुधवारी (दि. २२) नितेश राणे यांनी हजेरी लावली. यावेळी भाषण करताना नितेश राणे यांनी वादग्रस्त वक्तव्य केलंय. नितेश राणे म्हणाले की, हिंदूंच्या धर्म स्थळावर वक्फ बोर्ड दावा करत आहे. कुंभ मेळ्यातही वक्फ बोर्ड घुसखोरी करत



आहे. उद्या आळंदी येथे देखील वक्फ बोर्ड घुसखोरी करेल. सर्व धर्म समभावचा चारा ही नाटकं फक्त हिंदूसाठीच आहे, असे त्यांनी म्हटले.

नितेश राणेंचं वादग्रस्त वक्तव्य

नितेश राणे पुढे म्हणाले की, सेक्युलर हा शब्द आपल्या संविधानात नाही. सेक्युलर शब्द हा फक्त काँग्रेसची नाटकं आहेत. हे हिंदू राष्ट्र आहे, इथे फक्त आता हिंदूंचे हित पाहिले जाणार आहे. आगामी काळात आपल्या राज्यात एकही कत्तलखाना ठेवणार नाही. सरकार जे चालवत आहेत, त्यांचं रक्त लाल नाही, तर त्यांचं रक्त हे भगवं आहे. आम्ही या सरकारमध्ये नाही मिरवणार तर मग कुठे मिरवणार? या सरकारमध्ये आपली कॉलर टाईट करा. थडगे वगैरे जे काही बांधून ठेवले आहे, पीर-बाबा वगैरे यांना या राज्यामध्ये विचारू नका. त्यांना बाहेर ढकलून टाका. मोहम्मद पैगंबर यांना मानणारेच मुस्लीम पीर बाबा वगेरे मानत नाहीत. मैं इस बाप का हू की उस बाप का? यातच यांचा गोंधळ सुरू आहे, असे त्यांनी म्हटले.

नितेश राणेंना बावनकुळेंच्या कानपिचक्या

अभिनेता सैफ अली खानच्या घरात घुसलेला बांगलादेशी होता. सैफ व्यवस्थित चालत येत होता. त्यामुळे सैफवरील हल्ला संशयास्पद आहे. त्याने स्वत:च चाकू मारून घेतला की काय,' अशी शंका देखील नितेश राणे यांनी व्यक्त केली. यावरून चंद्रशेखर बावनकुळे यांनी नितेश राणे खडेबोल सुनावले आहेत. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, त्यांनी म्हटले आहे की चाकूचे वार आहेत, मोठे घाव आहेत तर एवढ्या लवकर कसे बरे झाले, असे वक्तव्य करण्याची गरज नाही. डॉक्टरांच्या उपचारावर प्रश्न चिन्ह उपस्थित करणे आवश्यक नाही, असे त्यांनी म्हटले.

# प्रयागराज विमान भाडे वाढीच्या विरोधात पुणे विमान तळासमोर आंदोलन

**मंचर । प्रतिनिधी**

'प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथे तब्बल १४४ वर्षानंतर भरणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी लाखो भाविक जात आहेत. पुण्याहून प्रयागराजला २५ दिवसांपूर्वी आठ हजार रुपये तिकीट होते. सध्या तिकिटासाठी ३१ हजार रुपये रक्कम घेतली जाते. विमान कंपन्यांनी विमानाच्या तिकीट दरात भरमसाठ तीन ते साडतीन पट वाढ केली आहे. भाविकांची होणारी लुट थांबवण्यासाठी विमान भाडे वाढीच्या विरोधात पुणे विमान तळासमोर संविनय पद्धतीने आंदोलन केले जाईल.' असा इशारा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी दिला.



मंचर (ता.आंबेगाव) येथे गुरुवारी (ता. २३) झालेल्या पत्रकार परिषदेत औटी बोलत होते. यावेळी ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक अशोक भोर, जिल्हा सचिव ज्ञानेश्वर उंडे उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय नागरी हवाई उड्डाण मंत्री राममोहन नायडू, केंद्रीय नगर विकास राज्य मंत्री मुरलीधर मोहळ यांना याबाबत निवेदन पाठविण्यात आले आहे.

औटी म्हणाले, 'सध्या इंधनाचे व इतर कोणतेही कर वाढलेले नाहीत. शेतकरी कुटुंबातील अनेक भाविक कुंभमेळ्यानिमित्त प्रथमच विमानात बसत आहेत. केंद्र सरकारने सर्व विमान कंपन्यांना विमान प्रवास तिकिटाचे दर रेल्वे व एसटी प्रमाणे ठरवून दिले पाहिजेत. सध्याचे विमान कंपन्यांचे तिकिटाचे दर हे भाविकांना परवडणारे नाहीत. ते अन्यायकारक असून खिशावर टाकलेला दरोडा आहे. विमान कंपन्यांवर केंद्राचे नियंत्रण राहिले नाही. असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. उलट तीर्थक्षेत्रासाठी जाणाऱ्या भाविकांच्या विमान प्रवासात केंद्राने सवलत देण्यासाठी पुढाकार घ्यावा.'

# डंपरच्या धडकेत युवतीचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी युवतीचा मृत्यू झाल्याची घटना बाणेर भागात घडली. अपघातात दुचाकीस्वार महिला जखमी झाली असून, पसार झालेल्या डंपचालकाविरुद्ध बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



मुक्ता संतोष काळे (वय १९, रा. म्हाळुंगे, बालेवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या युवतीचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार महिला शिल्पा कांबळे (वय ३६, रा. बालेवाडी गाव) जखमी झाल्या. याबाबत कांबळे यांनी बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुक्ता काळे ब्युटीपार्लर प्रशिक्षण अभ्यासक्रम करत होती. मंगळवारी (दि.२१) सकाळी अकराच्या सुमारास शिल्पा कांबळे आणि मुक्ता काळे बाणेर भागातील गणराज चौकातून निघाल्या होत्या. त्या वेळी सिग्नलला थांबलेल्या दुचाकीला भरधाव डंपरने पाठीमागून धडक दिली. यात मुक्ता डंपरच्या चाकाखाली सापडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीस्वार शिल्पा यांना दुखापत झाली. सहायक पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव तपास करत आहेत.

# काल्यांत रंगला निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा

**कार्ला । प्रतिनिधी**

येथील ग्रामदेवत श्री भैरवनाथ देवाचा वार्षिक उत्सव पारंपारिक पध्दतीने उत्साहात साजरा झाला. यासह उत्सवानिमित्त आयोजित निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा देखील उत्साहात संपन्न झाला. पौष पोर्णिमेला उत्सवाची सुरुवात झाली. सकाळपासून ग्रामदेवत भैरवनाथाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांनी रांगा लावल्या होत्या. सायंकाळी चार वाजता देवाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.



गावातील सुवासिनींनी पालखीचे स्वागत केले. शेवटी पालखी गावातील मारुती मंदिरात दर्शनासाठी ठेवण्यात आली. तिथे मंदिरात पाटण, दहिवली, शिलाटणे येथील भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर रात्री सुप्रसिद्ध नृत्यांगना राधा पाटील-मुंबईकर हिचा नृत्याचा कार्यक्रम संपन्न झाला. बुधवारी जंगी कुस्त्यांचा आखाडा भरविण्यात आला होता. यात अगदी शंभर रुपयापासून ते पंधरा हजार रुपयापर्यंत इनाम ठेवण्यात आले होते. गावातील मल्लांसह मावळ, मुळशी, हवेली, कर्जत, कल्याण, पुणे, कोल्हापूर, सांगली, कर्नाटक, हरियाणा येथील मल्लांनी सहभाग घेऊन कुस्त्यांमध्ये रंगत आणली.